


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २३१ * नांदेड * रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## हे शेवटचं आंदोलन, मागणीत एकही माघार नाही; अंतरवालीतून जरांगे पाटलांचा पुन्हा एल्गार

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र, जात पडताळणी समिती या मुद्द्यांवरुन राज्य सरकारला इशारा दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, जरांगे पाटलांनी उपोषणाला सुरुवात केली असून आज पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येनं मराठा बांधव अंतरवाली सराटीत दाखल झाल्याचं दिसून आलं. या बाधवांना जरांगे पाटलांनी संबोधित करताना, लवकरच मुंबई गाठण्याची तारीख जाहीर करू असे म्हटले.



आपल्याला महाराष्ट्रातील, मुंबईतील मराठ्यांनी नावं नाही ठेवले पाहिजे, हेही संस्कार जपले पाहिजेत. यावेळी, विजयापासून लांब जाऊ द्यायचं नाही ही जबाबदारी आपली आहे. यंदाचे उग्र आंदोलन सुद्धा मराठ्यांच्या शांततेपणात उग्र वाटले पाहिजे. हे शेवटच आंदोलन, याच्या मागणीत एकही माघार नाही. महाराष्ट्रातील बांधव बोलावून मुंबईची तारीख ठरवणार आहे. तीन दिवसांत मराठा मुंबईला नेऊन वापस आणलेला आपल्याला परवडणार नाही. त्यामुळे पक्की तयारी करायची आहे. येत्या १२ तारखेला मुंबईच्या तारखेची घोषणा करू, मुंबईत ५ टप्प्यात आंदोलन होईल, अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

मी काय चीज आहे हे सरकारला माहिती आहे, मी साधं रसायन नाही, त्यांच्यात चर्चा होती. त्यामुळे, ही लढाई आपल्याला नियोजनबद्ध करावी लागणार आहे. सरकारच्या डोक्याला मुंग्या आल्या पाहिजेत. सरकारला माज आलाय, आमचे कोणीच काही करू शकत नाही असं त्यांना वाटतंय. पण, मराठ्यापुढे सत्तेच शहाणपण चालत नाही. एकदा प्लॅनिंग झाली तर मुंबईच नाही दिल्ली सुद्धा हलवू शकतो, अशा शब्दांत जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला आहे. मला बोलता आले नाही तरी मला वर्षावर घेऊन जा, मी बारका दिसतो पण १०-१२ जण पाडू शकतो. मुंबईला ४०-४५ लाख मोटारसायकल काढायच्या आहेत, मी एकटा ट्रकवर येतो, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

मनोज जरांगे यांनी साठीतील मराठा समाज बांधवांना देखील आवाहन केलंय. म्हातारे माणसं जे ५०-६० च्या आतचे आहेत, त्यांनी मुंबईला चला. तरुण झुंजणार तर मग म्हातारे नोकरी करणार का? पारावर वेळ घालवण्यापेक्षा, समाजासाठी लढा, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

इथे कोणताच समाज सुखी नाही. मुंबईतील ना मराठी माणूस सुखी आहे, ना परप्रांतीय, मराठवाडी आणि जैनसुद्धा सुखी नाही. डी.बी. पाटलांचे नाव सुद्धा विमानतळाला द्यायला हे तयार नाहीत, यांना माज आलाय. १२ तारखेला जी तारीख ठरेल त्याची तयारी करावी. मुंबईतील मराठ्यांनी फक्त जेवण कमी पडू देऊ नये, असे म्हणत पुन्हा एकदा मुंबईला जायची तयारी सुरू असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं.

## नांदेड जिल्ह्यात पावसाची विश्रांती; ८१ टक्के पावसाची नोंद, गेल्यावर्षीपेक्षा २६७ मि.मी.ने घट

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील तालुकानिहाय दैनंदिन पर्जन्यमानाचा अधिकृत अहवाल प्रसिद्ध झाला असून, २९ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ८१.७७ टक्के पावसाची नोंद झाली आहे. १ जूनपासून आजवर जिल्ह्यात प्रत्यक्ष ५१६ मि.मी. पाऊस झाला असून, या कालावधीत अपेक्षित सरासरी ६३१ मिमी होतो.



मागील २४ तासांत (२८ ऑगस्ट सकाळी ८.३० ते २९ ऑगस्ट सकाळी ८.३०) जिल्ह्यात अत्यंत अल्प म्हणजे सरासरी ०.२० मि.मी. पावसाची नोंद झाली. यामध्ये किनवटमध्ये ०.७० मि.मी., मुदखेड, अर्धापूर, मुखेडमध्ये प्रत्येकी ०.५० मि.मी., हिमायतनगरमध्ये ०.३० मि.मी., माहूरमध्ये ०.२० मि.मी., तर उमरी व हदगावमध्ये प्रत्येकी ०.१० मि.मी. पाऊस झाला. उर्वरित ८ तालुक्यांत पावसाने पूर्ण विश्रांती घेतली आहे.

**मुदखेड आघाडीवर तर हदगाव सर्वात मागे**

तालुकानिहाय टक्केवारीत मुदखेडने सरासरी ओलांडत सर्वाधिक १०३.४६ टक्के (६४३.६० मि.मी.) पावसाची नोंद केली आहे. अर्धापूर (९६.८४ टक्के), मुखेड (९५.३९ टक्के), किनवट (९१.६७ टक्के) आणि देगलूर (९१.४४ टक्के) येथेही समाधानकारक पाऊस आहे. सर्वात कमी पाऊस हदगाव (६६.३४ टक्के, ४३९.२० मि.मी.) आणि बिलोली (६७.०८ टक्के, ४२७.८० मि.मी.) तालुक्यात झाला आहे. प्रत्यक्ष पावसात किनवट (६९८.६० मि.मी.) आणि माहूर (६८५.६० मि.मी.) अव्वल आहेत, तर नायगाव येथे सर्वात कमी ४१०.४० मि.मी. नोंद आहे.

**गेल्यावर्षीच्या तुलनेत मोठी घट, पिके करपण्याची भीती**

गेल्यावर्षी याच तारखेपर्यंत जिल्ह्यात ७८३.६० मि.मी. पाऊस झाला होता. त्यामानाने यंदा २६७.६० मि.मी. पाऊस कमी झाल्याने शेतकऱ्यांची पिके पुन्हा करपण्याच्या मार्गावर असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

## ममता बॅनर्जी यांच्यावर गुन्हा दाखल



**कोलकाता (प्रतिनिधी)–** तृणमूल काँग्रेसच्या वर्धापन दिन सोहळ्यादरम्यान कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप करत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि आयोजकांविरोधात कोलकाता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचा भंग झाल्याचे सांगत पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

कोलकाता येथील हॅस्टिंग्स पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेमुळे पश्चिम बंगालच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. २८ ऑगस्ट रोजी तृणमूल काँग्रेसच्या विद्यार्थी आघाडीचा वर्धापन दिन सोहळा कोलकाता येथील कॅथेड्रल रोड येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी कोलकाता उच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या अटींसह परवानगी दिली होती. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, कार्यक्रमादरम्यान कॅथेड्रल रोडची एक बाजू वाहतुकीसाठी पूर्णपणे मोकळी ठेवणे आणि सोहळा दिलेल्या वेळेतच पार पाडणे बंधनकारक होते.

## नेपाळच्या महाप्रलयात आतापर्यंत ६२६ जणांचा मृत्यू, १९२४ बेपत्ता

**काठमांडू (प्रतिनिधी)–** नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापूराने हाहाकार माजवला. या नैसर्गिक संकटाने आतापर्यंत ६२६ जणांना प्राण गमवावे लागले. तर जवळपास १९२४ बेपत्ता आहेत. या नैसर्गिक आपत्तीत अनेक भारतीय नेपाळमध्ये अडकून पडले आहेत. जवळपास ३२० भारतीयांशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. ते आता कुठे आहेत, ते सुरक्षित आहेत का? यासाठी शोध मोहिम आणि बचाव कार्य हाती घेण्यात येत आहे. तिबेटमधील जवळपास ४०० भारतीयांशी संपर्क झाला आहे. ते सुरक्षित आहेत. डोंगराळ भागात बचाव कार्य सुरू आहे. दरम्यान भोटेकाशी आणि त्रिशुला नदीच्या पात्रात पाणी पातळी वाढत आहे. यामुळे महापूराचा धोका वाढला आहे. शनिवारी सकाळी ६:३० वाजता भोटेकाशी आणि त्रिशूली नदीतील जलस्तर सामान्य आहे. पण तिबेटमध्ये पुन्हा एक तलाव फुटण्याची भीती व्यक्त होत असल्याने प्रशासनाने लोकांना अलर्ट जारी केला आहे.

## सप्टेंबरच्या सुरुवातीलाच पावसाचा जोर वाढणार?

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात यंदा मान्सूनची वाटचाल अपेक्षेप्रमाणे झालेली नसताना सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ४ आणि ५ सप्टेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर मराठवाड्याच्या काही भागांत पावसाचे प्रमाण वाढण्याचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा पावसाची स्थिती कमकुवत होण्याची शक्यता असून, १० ते २४ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रात पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

दरम्यान, राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ विभागांमध्ये पावसाची मोठी तूट कायम आहे. मराठवाड्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २७ टक्के कमी, तर विदर्भात २४ टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे. जून आणि जुलै महिन्यात देखील



पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची तूट आहे. ऑगस्ट महिन्यातही पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने सप्टेंबरमधील काही दिवसांच्या पावसाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आज पूर्व विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागाने या भागासाठी 'येलो अलर्ट' जारी केला आहे. हिंगोली, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता आहे.

२७ ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान पूर्व भारतात चांगला पाऊस राहण्याची शक्यता आहे. याच काळात ४-५ सप्टेंबरदरम्यान मध्य भारत, विदर्भ आणि उत्तर मराठवाड्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मात्र, १० सप्टेंबरनंतर महाराष्ट्रात पुन्हा पावसाचे प्रमाण कमी होण्याचा अंदाज असल्याने काही दिवसांचा वाढलेला पाऊस राज्यातील एकूण तूट भरून काढण्यासाठी पुरेसा ठरणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## 'सिप्ला फार्मा'चा परवाना रद्द, नियमांचे उल्लंघन केल्याने 'एफडीए'ची कारवाई

**पुणे (प्रतिनिधी)–** अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुण्यातील वडकी येथील 'मेसर्स सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस लिमिटेड' या कंपनीचा औषध विक्री परवाना रद्द केला. नियमांचे उल्लंघन केल्याने 'एफडीए'ने ही कारवाई केली. 'एफडीए'च्या पथकाने जून २०२६ मध्ये या कंपनीच्या वडकी येथील मुख्य गोदामावर छापा टाकला, तेव्हा डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय न विकायचे औषध असलेल्या 'शेड्यूल एच' गोळ्यांच्या पॅकिंगवर 'अनाल्जेसिक व अँटीपायरेटिक' असा जाहिरातवजा मजकूर छापल्याचे उघडकीस आले. 'औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० आणि नियम १९४५ नुसार अशा प्रकारची जाहिरात बेकायदा असून, यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्वतःच औषधे घेण्याची धोकादायक प्रवृत्ती वाढून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण होतो,' असे 'एफडीए'कडून स्पष्ट करण्यात आले.




या कारवाईत प्रशासनाने ११.१९ लाख रुपये किमतीचा साठा जप्त केला. कारवाईनंतर 'एफडीए'ने संबंधित साठा बाजारातून परत मागविण्याचा आदेश दिला. मात्र, कंपनीने त्याचे पालन केले नाही. त्यानंतर 'एफडीए'ने केलेल्या तपासणीत औषधांचा साठा जमिनीवर ठेवणे, खरेदी-विक्रीच्या नोंदी आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, मुदतबाह्य औषधांच्या व्यवस्थापनात गोंधळ अशा अनेक त्रुटी आढळून आल्या. कंपनीने याबाबत दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने परवाना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती 'एफडीए'कडून देण्यात आली.

'औषधांची सुरक्षितता आणि नागरिकांचे आरोग्य याबाबत कोणतीही शिथिलता खपवून घेतली जाणार नाही. विशेषतः 'शेड्यूल एच' औषधांची जाहिरात, विक्री आणि वितरणात नियमांचे कठोर पालन व्हायलाच हवे. उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरू राहील,' असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

## बैलाला वाचवताना स्विफ्ट कार दरीत कोसळली; चौघे गंभीर जखमी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वर हदगाव- वारंगा रोडवरील बामणी फाटा येथील मामीडवार पेट्रोल पंपाजवळ बैलाला वाचवण्याच्या प्रयत्नात स्विफ्ट डिझायर कार दरीत कोसळून चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील शेंडे परिवारातील ९ जण (त्यात दोन लहान मुले) शिर्डी, शेगाव, सोलापूर येथील देवदर्शन करून नागपूरकडे परतत होते. बामणी फाट्याजवळ अचानक समोर बैल आल्याने बैलाला धडक बसू नये म्हणून चालकाने कार वळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्यालगतच्या दरीत जाऊन कोसळली.



या अपघातात तेजराम शेंडे (वय ३७), रितू वाघूलकर (२७), सोनू नदतकर (३६) आणि सुशील बघेले (३०) हे चौघे गंभीर जखमी झाले आहेत. सुदैवाने जीवितहानी टळली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत जखमींना कारमधून बाहेर काढून मदत केली.


घटनेची माहिती मिळताच मनाठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी धाव घेत नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग ३६१ वरील दुभाजकावर चरत असलेली जनावरे अचानक रस्त्यावर येत असल्याने भरधाव वाहनचालकांना नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. यामुळे अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनधारकांतून होत आहे.

## ऑटो-दुचाकीच्या धडकेत वृद्ध महिला ठार

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील चिखली फाटा ते सोनाळा मार्गावर शनिवारी दि.२९ दुपारी ऑटो आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात एका ६० वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत अन्य दोन जण गंभीर जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे.

सोनाळाकडून चिखलीच्या दिशेने येणाऱ्या दुचाकीची किनवटकडून येणाऱ्या ऑटो रिक्षासोबत जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, या दुर्घटनेत एका महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृत महिलेचे नाव नरपतबाई बद्धूसिंग कटकवाल (वय ६०, रा. हिमायत गुंठा, तेलंगणा) असे आहे. अपघातातील दोघा गंभीर जखमींना तातडीने गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे.




## नेपाळमधून १४३ भाविक मायभूमी महाराष्ट्रात परतले

**मुंबई (प्रतिनिधी)–** नेपाळच्या महाप्रलयातून आपला जीव मुठीत धरुन अकडलेले महाराष्ट्रातील भाविकांना मदत पोहोचली असून ते मायभूमीत परत येत आहेत. नागपूरचे १०६, महाराष्ट्रातील इतर ३७ भाविक आज आपल्या घरी येण्यासाठी रवाना झाले आहेत. त्यामध्ये, १०६ भाविक नागपूरला उतरतील, तर ३७ नागरिक मुंबईत पोहोचले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेल्या १०६ भाविकांचा महाराष्ट्राकडे सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाल्याने कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे. नेपाळपासून पटणापर्यंत भाविकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक समन्वय आणि मदतही करण्यात आली. नेपाळहून परतणाऱ्या या प्रवाशांच्या महाराष्ट्रात सुखरूप परतण्यासाठी रेल्वे प्रवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. आज सकाळी ७:३६ वाजता रेल्वे क्र. १७६०९ ने पाटणाहून नागपूरकडे सर्व भाविक सुखरूप रवाना झाले आहेत. त्यामुळे, संकटाच्या काळात तातडीने मदत केल्याबद्दल सर्व भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

काठमांडूमध्ये अडकलेल्या नागपूरच्या १०६ भाविकांची सुरक्षित देशवापसी झाली आहे, काही मोजके प्रवासी दिल्लीमार्गे तर उर्वरित बहुतांशी प्रवासी बिहारमधून रेल्वे मार्गे नागपूरला परतणार आहे.



नेपाळमध्ये दर्शनासाठी गेलेले नागपूरचे १०६ भाविक काठमांडूमध्ये अडकले होते. काठमांडूमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे भाविकांना परतीच्या प्रवासात अडचणी निर्माण झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेपाळ प्रशासनाशी चर्चा करून भाविकांच्या सुरक्षित परतीची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. काठमांडू प्रशासनाने भाविकांसाठी ४ खासगी बस उपलब्ध करून दिल्या, सर्व १०६ भाविक शुक्रवारी काठमांडूहून सीतामढीसाठी रवाना झाले होते.

## ऊसाच्या गाळप हंगामासाठी हालचाली सुरू; हंगामाला दिवाळीनंतरच गती येणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी ऊस गाळप हंगाम २०२६ २७ सुरू करण्यासाठी राज्यातील साखर कारखान्यांना गाळप परवाना घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कारखान्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावयाचा आहे. गाळप परवाना प्राप्त केल्याशिवाय कोणत्याही कारखान्याला गाळप हंगाम सुरू करता येणार नाही. दरम्यान, साखरेच्या तुटवड्यामुळे हंगाम लवकर सुरू करण्याची सरकारी पातळीवर लगबग सुरू झाली असली तरीही दिवाळीनंतरच हंगामाला गती येणार आहे.



पुणे येथील साखर आयुक्तालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार ऊस गाळप हंगाम २०२५-२६ च्या ऊस गाळप हंगामाचा आढावा तसेच सन २०२६-२७ मधील गाळप हंगामाबाबत मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीच्या बैठकीत निर्णय होणार आहे. या निर्णयानंतर गाळप हंगाम सुरू करण्याची तारीख निश्चित केली जाणार आहे. त्यापूर्वी सर्व साखर कारखान्यांनी गाळप परवान्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

साखर कारखान्यांनी गाळप परवान्यासाठी ऑनलाइन अर्ज १ सप्टेंबरपासून सादर करायचा आहे. त्यासाठी साखर आयुक्तालयाने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन प्रणालीचा वापर करावा लागणार आहे.

# झोरा...

कथा

मा ऽऽऽऽ ! व मा ऽऽऽऽ बा आले नाह्यी काय वावरातूनं अखिनं. तुकाराम बोल्ला. कामूनं बाप्पा अज् लयचं याद येवूनं राह्यली तुले बापाची. कमला बोलली. अव् अज् आपल्या गावचा बझार नाह्यी काय गुजरीत. मले भातकं खा वाटूशी राह्यलं ना. म्हनून म्हतल बा आले नाही काय अजून. येतीनं नं मंग त्वाले बा कुठसा जातीनं. अज डव-याले बब्बूभाऊच्या वावरात गेले होते. लयचं दूर हायं थे वावरं. तिसरी अजानं झाल्यावर येतीनं हं ऽऽऽ बाबू त्वाले बा.

अस् लेकराले समजावत कमला चा कराले चुलीजौळ गेली. पऱ्हाटीच्या चार काळ्याची मुठ चुलीच्या तोंडात टाकली. तुऱ्हाटीची एक बारीक काळी मोळ्ळी सौद्यात आलेला कागद फाळूनं चिळीच्या पिव्या वातीवर धरला. तु-हाटीच्या काळी जौळ धरला. चुलीनं पेट धरला. चूल पेटोली गेली. चूलं लाल पिव्व दुरंगी लुगळ घालूनू नटली सजली होती. कमलानं आकारानं ऊलिशी गंजोली चुलीवर ठुयली. थे जोंधयाच्या कन्सावानी तुर्रेबाज दिसत होती. गुयाची भेली ईव्यानं फोळून ऊल्सा खळा गुय,पत्ती, अन् चा च जंगली गवत गंजोलीत टाकल्या गेलं. चा ले साजरी ऊकयी आल्यावर कमला तुक्याले बोल्ली.

तुकाऽऽऽ जंदेल कबरी बकरीचं दूध दोवूनं आन बर तांब्यात. ऊल्सच दोयजो. पाट बोकळ्याचं पोट भरलं पाह्यजे. नाह्यीत आपन तुपाशी अन् मुकं जनावरं ऊपाशी अस होयनं.

हव मा आनतो. तुक्यानं पाटलीवरचा पितयीचा तांब्या घेतला. न्हानीत जावून नांदीतलं पानी घेवूनं इसयला अन् झ्यटकला.... अन् आला कबरी बकरी जौळ. हागाले बसाव तसा तीच्या जौळ बसला. डाव्या हातात तांब्या धरला. जसा त्यानं तीच्या लंबोट थानाले हात लावला तशी थे बिथरली अन् तळालकनं ऊळूनं मांगल्या दोन्ही लाथा तुक्याले हानल्या. तसा त्याच्या हातचा तांब्या खाली पळ्ळा अन् हाताले साजरचं खुर लागलं. तसा कमलानं रांधन घरातून अवाज लगावला. काय रे तुक्या दुद सांडोल काय?. मा चंदरा दूद काहाळू देत नाही. नि-हा लाथाच झाळू रा-हली. कोनाले तरी घे पाय धराले. मंगच थे काहाळू देईनं. तीले तीच्या लेकराची फिकर असते. म्हनून थे तशी करते. तशी थे मारकी नाही हं.

कमला बोल्ली. बरं मा. गावातला गन्या घरा मोहरून चाल्ला होता. तुक्यानं थ्याले अवाज लगावला. अय गन्या ईकळे ये रे. काय रे तुक्या काय म्हनत. कायी नाह्यी रे. बकरी दूद काहाळू देत नाही. आमाश्येक पाय धर बरं. गन्या आला. कबरी बकरीचे मांगचे दोही पाय फ-याजौळ दाबूनं धरले. तुक्यानं चुरूक बुरूक करत कबरी बकरीचं दुद दोयाले सुरवात केली. बकरीनं लेकरायसाठी पन्हा ओळूनं धरला. बकरीचं घट घट दुद होतं. मायनं सांगल्या परमान अरधाच ताब्या दूद काहाळलं. डाल्याखाली लपवेल पाट बोकळ्या मोकये केले. थे दुडक्या चालीनं धावतच जावूनं मायच्या थानाले हुंदके देत झटले होते. गुटगुटू दुद पेत होते. बकरीनं पन्हा सोळ्ळा. थानं गुलाबी दिसत होते. नसा टारून भुगल्या होत्या. पाट बोकळ्याच्या दुद पेता पेता तेयच्या तोंडाले फेस आला होता. तेयचं पोट सट्ठ फुगलं होतं. कबरी बकरी जुनी होती. कधी एक कधी दोन त कधी तिळे पिल्ल जल्माले घालत होती.

तुक्यानं दुद माय जौळ आनून ठुयलं. ऊल्स दुद कमलानं गंजूलित वतलं. चहा चा वास खमननं घरभर कोंदटला होता. सखाराम हा तुक्याचा लायना भाऊ खेयता खेयता घामाझोकय होवूनं घरात धावत- पयत आला. मा मले दे नं ऊल्सा चा ! अस् म्हनूनसन्या तगादा लावत होता. पदरान लेकराचा घाम पुसत कमला बोल्ली.

बाबू लानं लेकरायनं चा पीवू नोयं नाह्यीत आतये भूक मारते . आपनं कोयश्यासारखं काय होतो. मले पाह्यजे बाई व. मले चा पाह्यजे. असं म्हनत घरात पाय घासत होता. तुकाराम दहा सालचा त सखाराम सहा सालाचा झाला होता. पुंडलिकराव अन् कमलाले हे दोनं लेकरं होतं. ऊमरावती जिल्ह्यातलं मदलापूर नावाचं तीनशेक घराचं टुमदार गावं. पूर्णा नदीच्या काठावर वसलेलं गाव. ह्या गावात हरेक घर कौला - मातीच होतं. फकस्त एकचं घरं कुळाचं होतं. थे होतं पुंडलिकाच.

पुंडलिकराव थकूनं भागूनं आला. खांद्यावरला डवरा आंगनाच्या कोप-यात त्यान ऊभा केला. खांद्यावरल्या टवालानं तोंडाचा घाम पुसत. थो थकलेल्या अवाजात बोल्ला. तुका पानी आन रे प्याले. असा अवाज लगावला. कमलानं लगेच तांब्याभरून पानी आनलं. चुलीवरला चा ऊल्यावर ठेवला. भरलेली बटलई चुलीवर ठेवली. टेम्प अन् गवरीचं पाव खांड चुलीत खोसलं. चिळीचं मुंडक काहाळूनं मातीचं तेलं वातीनं झिल्पीवर टाकलं. चूल साजरीचं भळकली होती. वाफायलेला ऊल्यावरला चा टुटक्या कानाच्या सिंगलात वतला. फुरक्या मारून थो चा पेला. नव-याले तांब्याच्या गंगायात गरम झालेलं पानी वतूनं देल्लं. पुंडलिकरावनं हातापायावरूनं खापरं फिरोली. शेल्याले हातपाय पुसूनं सदरा - पैज्यामा घातला. खुट्याले टांगलेला झोरा घेतला...

दे बरं ईसक रूपये. बझार करूनं आनतो. पुंडलिक टायवरी घालता घालता बोल्ला. बाप्पा माह्याजौळ काहाचे पैसे. देवूनं ठुयले होते काय तुम्ही. मांगल्या ईतवारीचं त जोंधये आनाले देल्ले होते. अन् टोंगयाच्यानं आठ रोजापासूनं मी ही कुठसा गेली भारे बांधाले. टोंगयाले लागल्यान कमला घरीच होती. पुंडलिक बोल्ला. हवं लेकं बराबर हाय त्वालं. बरं पाह्यतो बजारात कोनी पैसा -अदला ऊसना-वासना, ऊधार पाधार देते कायं त. असं बोलूनं पुंडलिकरावन घरातूनं काहळता पाय जसा घेतला...तितल्यात तुकाराम मांग लागला. बा मी येतो ना, बझारात तुमच्यासंग. तू घरीचं थाम्ब बाबू मी बात येतो बजार करूनं.

नाह्यी मी येतो म्हनजे येतो. मले काय तुमच्या डोक्शावर बसा लागते काय. येतो मी तुमच्या मांग मांग. तुका बापाच्या कुरत्याचा कपळा धरत बापाले ईनवनी करत होता. बाबू बझारात अंधारभूळूक असते. मी बात जातो अन् बात येतो. तू घरीच थांब. तुले भातक पाह्यजेना. मले भातकं त पाह्यजेच पन् मले तुमच्यासंग याच हाय. तुले काय पाह्यजे सांग आनतो मी.

मले रेतीतले पोंगे, इमरती, लाल ऊस अन् भातकं पाह्यजे...पन् मले तुमच्यासंग याचचं हाय. मी पैदलच चालतो ना. न्या ना हो कुठ थ्याले तुम्हाले खांद्यावर बसून न्या लागते. कमला नवऱ्याले बोल्ली.

बरं ये त खरी पन् दिसनं थे मांगू नोको. पयलेचं पैसा नाह्यी. कोनी ओयखीचं पायखीचं भेटते काय त पाहा लागनं. हावं बा मी काह्यीचं नाह्यी मांगत. फकस्त भातकं देजा कोन्चही. असं बोलूनं दोघही बापलेकं गुजरीच्या दिशेनं निंघाले. बझाराच्या एकांग मासोयाचा मयकटलेला वास वा-यावर घुमत होता. कापलेला अन् शिललेला बोकळ्या बांबूंच्या तिरकुटाले लोंबकळत टांगलेला होता. बोकळ्याचं डोये खुल्लं असलेलं मुंडक पाटलीवर ठुयेलं होतं. हल्क मटनं आताये पितये , फुफुस, जठर डाव्याबाजूनं एकांग गंजी मारूनं ठुयलं होतं. टांगलेला छिललेला बोकळ्या अल्लादी अल्लादी हालत होता. त्याच्यात जीव बाकी होता. हे पाहूनं तुक्याच्या आंगावर काटा ऊभा झाला. बा थो पा बोकळ्या कसा हालते. त्याच्यात ऊल्सा जीव बाकी हाय बाबू म्हनून थो हालते. तथून ऊल्श्याचं अंतरावर गढीवर टालाच्या शेजी डंग-याचं मटनं भेटत होतं. बोकळ्याच्या मटनापरीस डंग-याच मटन सस्त असल्यान तिकळे काही लोकं चाल्ले होते. दोघही बापलेकं थो वास पारं करत गुजरीत चाल्ले होते. तुक्याची चड्डी खाली घसरत चाल्ली होती.तुक्यानं तु-हाटीची काळी घेतली.करदोयात गोल फिरोली अन् चड्डी फिट्ट केली. चड्डी मनील्याची बझारात गंजी पाहून तुक्याले वाटलं असे नये कपळे मले असते त मी किती साजरं दिसलो असतो. नये कोरे पाहूनं अन् तेयचा वास घेवूनं तुकाराम लयचं खुस होतं होता. पुंडलिकरावची नजर भिरभिरत होती. कोनाजौळूनं ऊसने घेवू ह्या ईचारानं थो पिसायला होता. दोन तीन ओयखीच्या लोकायले पैसे ऊधार मंगले पन् तेयन नकार देल्ला होता. लोकायचे टच्च भरेलं झोरे अन् गाठोये पाहूनसन्या त्याचं कायीज थटथट टुटत होतं. बजाराच्या एका कोप-यात हलवायाचं पाल टाकलेलं दुकानं तुकारामाले दिसलं. थ्या पालीतला शेव -चिवळा, शंकरपाळे, बालूशाई, जिल्बी, इमरती, पेळा, कलाकंद,बुंदा, बेसनलाळवं हे सारं खुनावत त्याच्या तोंडाले पानी सोळतं होते. त दुस-या बाजूनं काये फुटाने, पिव्वे फुटाने, मसाल्याचे फुटाने, दालव्या, खरमुरे, रेतीतले पोंगे, रेतीतल्या लाल पिव्या सया, मुरमुरे हे ही सारं भातकं तुक्याची लायं पाळतं होतं . तुक्याचं थ्या दुकानाकळे एकटक पाहूनसन्या थुका गीटनं पुंडलिकाच्या जिव्हारी लागूनं गेलं. पुंडलिकरावन झोरा गोल फिरवतं मनगटावर गुंडायला अन् बाल्याले बोल्ला.

काय रे काय पाहूनं राह्यला तिकळे. काह्यी नाह्यी बा. मी ईचार करत होतो अज् कोन्च भातकं घ्याव. तुक्याचे बोलं आयकूनं पुंडलिकराव ईचारात पळ्ळा. कोनं ऊसने देईनं म्हनूनसन्या. बजारभर कलोयं कलोयं चाल्ला होता. जागोजागी पाला थाटल्या होत्या. संध्याकाय होताचं टेंभ्यानं पाला ऊजयल्या होत्या. बजारभर गर्दीच गर्दी ऊसयली दिसत होती. भाजीपाला ईकनारे, तमाखू ,चुना, पानं ईकनारे, मसाला ईकनारे, कपळे ईकनारे, टायवरी चपला ईकनारे,गुय ईकनारे,खेयनी ईकनारे, कटलरीचं सामायनं ईकनारे सारे जोरजो-यात अळ्ळावूनं - अळ्ळावूनं गि-हाईकायले बलावत होते.

एक भाजीपाला ईकनारा मानूस जोरजो-यात बोंबलत होता. घेता काय ईकत नाहीत वाटतो फुकट.... घेता काय ईकत नाहीत वाटतो फुकत असा अळ्ळावत होता. तुका बा ले बोल्ला. बा भाजीपाला फुकट भेटते त घ्या ना तथिसा. फुकट कोनी देत असते काय बाबू. थे बोलाची बात हायं. थो फुकट वाटनं त खाईन काय. गि-हाईक त्याच्याकळे आले पाह्यजेन यासाठी थो तस म्हनते. अस्स हाय काय थे. हव तसच हाय थे. भंटोलं पोरं पोरीच्या मांग गूखाय-या डुकरासारखे लागले होते. गर्दीत थे पोरीले धक्केही लावत होते. कुतरे, डुकरं , गाई, बक-या, आक्के अन् मांजरी बजारात चंगळ करत फिरत होत्या. दोघही बापलेकं बजारभर फिरूनं ऊसाच्या बंडीजौळ येवूनं ऊभे झाले. ओयखीच्या ब-याच लोकाले पुंडलिकरावन ऊधार मांगूनं पाह्यलं. कोनीचं द्याले तयार होत नोत. जो-यानं सुस्कारा टाकत पुंडलिकराव सोताच्या मनाशी बोल्ला... अगणीक दुखं झेलली म्या ह्या बजाराच्या दिशी. होता रिकामा झोरा अन् बायकोची पिवशी ही रिकामी. हिरमुसल्या तोंडानं बजारभर नजर फिरवत पाह्यतं होतो दानी ... देईनं काय ऊधार पाधार कोनी. वाऱ्यावर फिरनारा भातक्याचा वास लेकराले हुलकनी देत होता... अन् माह्या कायजाले भोक पाळूनं जात होता. जिभीनं व्हठ चाटे लेकरू अन् पोटात निंघे ऊभायं. बजारभर हाये कल्ला - हल्ला पोत्याखाली दाबल्या जावूनं राह्यल्या नोटा .अजूनही धिर कसा सोळू मी. बा काय झालं. कोनी ऊधार देवूनं नाही राह्यलं काय. तुका बापाले बोल्ला. थाम्ब काहितरी जुगाळ करतो तुका. भातक्याले पाहूनं लूसलूस करनारे डोये पाहूनं पुंडलिकरावचं मन थटथट टुटत होतं...अन् चालूनं चालूनं पोट-याले दोघायच्या गोये आले होते.


भरलेले लोकायचे झोरे. कोनाच्या बायकोले लुगळे कोरे पाहूनं पुंडलिकरावचा जीव झुरनी पळ्ळा होता... पन् अखिन त्यान धिर सोळ्ळा नोता. बांधूनं ठेवला होता मनगटावर अख्खा एल्गार. पुंडलिकरावच्या मनाले वाटलं 'राहूदे रिकामा झोरा ' सायाचा पन् छटाकभर लेकराले भातकं त घ्यावं...म्हनून पुंडलिकराव लेकराचा हात धरून लालचंद मारवाळी हलवायाच्या दुकानापुळे एखांद्या चोरा सारखा गेला. लालचंद भौ जरा छटाकभर चिवळा द्या बर. क्या पुंडलिक आं ऽऽऽ पयले का पैसा दिया नही और चला मूँह ऊठाके छटाकभर मांगने. पयले का पैसा डाल फिर दूँगा. मांगलेच पैसे देन होते. म्हनून मारवाळी नानंगूनं करत होता. मारवाळ्याचे बोल आयकून पुंडलिकराव धाकी पळ्ळा होता. बापाचा पळेल काया ठिक्कर मुखळा पाहूनं तुक्याच मन हेलावल . बाबा राहू द्या मंग या बारीनं भातकं. खाच लागते काय दर बजाराले....या बारीनं नाही त नाही. चला घरी.

तव्हा मातर पुंडलिकराव एखांद्या लेकरावानी तुक्याले पोटाशी घेवूनं ढसढसा बझारात एकांग घेवूनं अंधारात लळला. किती समजदार हाय माह्यं लेकरू बापा. अस म्हनत पुंडलिकरावन सोताचे आसू अस्तीनीले पुसले.अन् दोघही बापलेक झोरा हालवत घराच्या दिशेनं निंघाले. दिस मास लोटले. तका ऑफीसर झाला. पुंडलिकराव देवाघरी गेला. पन्... बापाचे सारे आसवं आताही तुक्यानं त्याच्या पांढ्या मनिल्यात कैद करून ठेवेलं होते.गरिबीचे दिवस अन् बापाचे मोती म्हनूनसन्या.....आजही तुक्यानं थो सदरा धुतला नाही. बापाच्या आसवाचा अमर अत्तर अन् जगन्यासाठी ऊर्मी अन् ऊर्जा देनारा थो आसवाचा सदरा अन् रिकामा झोरा एका अभेद्द अश्या पोलादाच्या तिजोरीत जतनं केला होता अगदी कायमचा.

**-सु. पुं. अढाऊकर**
मुंबई.
मो. ९७६९२०२५९७

# 'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' ग्रंथाचे मूल्यमापन

पुस्तक परीक्षण
**पंडित पवळे**
नांदेड
मो. ९८९०२३२९६२




मराठी बालसाहित्याच्या विश्वात बालकविता हा केवळ करमणुकीचा प्रकार राहिलेला नाही. बालमनाची जडणघडण, त्याच्या कल्पनाशक्तीचा विकास, प्रश्न विचारण्याची वृत्ती, निसर्गाशी नाते, वैज्ञानिक दृष्टी, सामाजिक जाणिवा आणि मूल्यसंस्कार यांना आकार देणारे प्रभावी माध्यम म्हणून बालकवितेकडे पाहिले जाते. अशा समृद्ध आणि व्यापक परिप्रेक्ष्यात डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेचा चिकित्सक, संशोधनात्मक आणि साहित्यिक वेध घेणारा 'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' हा ग्रंथ मराठी बालसाहित्याच्या अभ्यासकांसाठी निश्चितच महत्त्वाची साहित्यकृती ठरतो.

या ग्रंथाचे लेखक प्रा. साईनाथ पाचारणे हे भोर येथील निर्मलाताई थोपटे अध्यापक विद्यालयाचे माजी प्राचार्य असून २५० हून अधिक पुस्तके प्रकाशित असणारे अनुभवी लेखक-समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वात स्वतंत्र ओळख आहे. त्यांच्या लेखणीतून साकारलेला हा ग्रंथ संगत प्रकाशन, नांदेड यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रथम आवृत्ती म्हणून प्रकाशित झाला आहे. तब्बल १७६ पृष्ठांचा आणि १९ प्रकरणांमध्ये विभागलेला हा ग्रंथ वाचला. वाचनातून जाणवलेली त्याची चिकित्सकता, संशोधनशीलता आणि बालसाहित्याकडे पाहण्याची वेगळी दृष्टी यामुळे या ग्रंथाविषयी लिहावेसे वाटले.

डॉ. सुरेश सावंत हे समकालीन मराठी बालसाहित्याला दिशा देणाऱ्या महत्त्वाच्या साहित्यिकांपैकी एक आहेत. त्यांच्या बालकवितेचा प्रवास केवळ बालमनोरंजनापासून सुरू होऊन तेथेच थांबत नाही; उलट तो बालकांच्या जिज्ञासेपासून ज्ञानाकडे, निसर्गाकडून विज्ञानाकडे, कल्पनेपासून सामाजिक वास्तवाकडे आणि व्यक्तिगत अनुभवापासून व्यापक सामाजिक जाणिवेकडे घेऊन जातो. हीच त्यांच्या कवितेची खरी ताकद आहे. प्रा. पाचारणे यांनी या प्रवासाचा केवळ परिचय करून दिलेला नाही, तर त्यामागील आशयसूत्रे शोधून काढली आहेत. प्रत्येक कवितासंग्रहाकडे स्वतंत्र साहित्यिक दस्तऐवज म्हणून पाहताना त्यातील विषय, प्रतिमा, भाषाशैली, कल्पनाशक्ती, बालमानसशास्त्र, मूल्यदृष्टी आणि सामाजिक आशय यांचे बारकाईने विश्लेषण केले आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ समीक्षाग्रंथ न राहता डॉ. सुरेश सावंत यांच्या बालसाहित्याचा समग्र अभ्यास करणारा संदर्भग्रंथ बनतो.

'हिरवे हिरवे झाड' ते 'रंग लागले नाचायला'

ग्रंथातील विविध प्रकरणांतून डॉ. सावंत यांच्या बालकवितेची बहुरंगी दुनिया उलगडत जाते. 'हिरवे हिरवे झाड' या संग्रहाच्या माध्यमातून निसर्गाचे प्रेरक आणि प्रतीकात्मक रूप लेखकाने उलगडले आहे. झाड हे केवळ झाड न राहता बालमनाला सावली, जीवन, पर्यावरण, संवेदना आणि सहजीवनाचा संदेश देणारे जिवंत प्रतीक बनते.

'जांभुळबेट'मधील कविता बालमनाला फुलवतात. बालपणातील कुतूहल, खेळ, कल्पना आणि अनुभव यांना कवितेची गोड भाषा मिळते. बालकांच्या मनात निर्माण होणाऱ्या छोट्या-छोट्या प्रश्नांना आणि आश्चर्यांना कवी कवितेतून सहज शब्द देतो.

'भुताचा भाऊ' या संग्रहातील कविता मनोरंजनाच्या चौकटीत राहून ज्ञानार्जनाची प्रक्रिया गतिमान करतात. बालमनाला अवघड वाटणारे भौतिक ज्ञान, विज्ञान आणि निरीक्षणाची दृष्टी विनोद, कल्पना आणि काव्यमयतेच्या माध्यमातून सहज आत्मसात करता येते, हे या कवितांमधून दिसते.

'बालकनीती' या संग्रहात बालकांच्या माध्यमातून पालकांशी संवाद साधण्याची अनोखी शैली दिसते. बालकांच्या जगाकडे पालकांनी कोणत्या संवेदनशीलतेने पाहावे, त्यांना समजून घेताना कोणती भूमिका घ्यावी, याविषयीचे सूचक भाष्य कवितेतून पुढे येते. त्यामुळे ही कविता केवळ मुलांसाठी राहत नाही; ती मोठ्यांनाही आरसा दाखवते. 'काठीचा घोडा' मधील पशुपक्ष्यांविषयीच्या मनोरंजक कविता बालमनाला आनंद देतात. प्राणी-पक्ष्यांच्या जगाशी मुलांचे भावनिक नाते जोडण्याचे काम या कविता करतात. त्यातून निरीक्षण, सहानुभूती आणि सजीवसृष्टीविषयी प्रेम निर्माण होते. 'पळसपापडी' हा संग्रह नावाप्रमाणेच रंगीबेरंगी, मोहक आणि मनाला भुरळ घालणारा आहे. पळसाच्या फुलांसारखी त्यातील कविता बालमनावर रंग उधळतात. 'कॉमिक्सच्या जगात' या संग्रहातून डॉ. सावंत यांनी चाकोरीबाहेरील विषयांना बालकवितेच्या कक्षेत आणले आहे. आधुनिक बालक ज्या नव्या दृश्य-जगात वाढत आहे, त्याचा कवितेने स्वीकार केला पाहिजे, याची जाणीव या संग्रहातून होते. 'रानफुले' मधील निवडक कविता बालकांच्या मनात प्रेरणेची बीजे पेरतात. ग्रामीण आणि नैसर्गिक जीवनातील प्रतिमा बालमनाशी सहज संवाद साधतात.

डॉ. सावंत यांच्या बालकवितेतील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मूल्यविचार. 'युद्ध नको बुद्ध हवा' हा संग्रह या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे. युद्ध आणि शांतता, हिंसा आणि विवेक, वाईट आणि चांगले या संघर्षाचे बालमनाला समजेल अशा पातळीवर केलेले काव्यात्मक चित्रण या संग्रहात आढळते. म्हणूनच समीक्षकाने त्याला चांगल्या आणि वाईटाच्या संघर्षाचे महाकाव्य म्हटले आहे, ही उपमा सार्थ वाटते. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात बालकांच्या मनात शांतता, सहिष्णुता आणि विवेकाची मूल्ये रुजविण्याची आवश्यकता आहे. अशा वेळी या कवितांचा सामाजिक आशय अधिक महत्त्वाचा ठरतो.

'नदी रुसली नदी हसली' हा संग्रह बालमनाच्या आकलनक्षमतेला दिशा देणारा आहे. नदीशी मानवी नाते जोडताना कवी पर्यावरणीय जाणीवही जागृत करतो.

'गुगलबाबा' मध्ये विज्ञान आणि निसर्ग यांचे सहज आकलन करून देणाऱ्या कविता आहेत. आजच्या डिजिटल युगातील मुलाला 'गुगल' परिचित आहे; त्या परिचयातून ज्ञानाची नवी दारे उघडण्याचा कवीचा प्रयत्न दिसतो.

'एलियन आला स्वप्नात' या संग्रहातून अपरिचित विषय बालकवितेच्या विश्वात येतात. अंतराळ, परग्रहावरील कल्पना आणि अद्भुत विश्व यांना कवी बालमनाच्या कल्पनाशक्तीशी जोडतो. त्यामुळे मुलांच्या स्वप्नांना आकाशाची मर्यादा राहत नाही. 'आभाळमाया' हा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवितासंग्रह असल्याने त्याचे साहित्यिक महत्त्व वेगळेच आहे. आकाशासारखी व्यापकता, मायेची ऊब आणि बालमनाची कोवळीक यांचा सुंदर संगम या संग्रहात जाणवतो. 'रंग लागले नाचायला' हा संग्रह म्हणजे काव्यगुणांची रंगीत-गंधित मैफलच म्हणावी लागेल. शब्द, लय, प्रतिमा, कल्पना आणि भाव यांचे विविध रंग येथे एकत्र येतात. बालकवितेची सौंदर्यदृष्टी किती व्यापक असू शकते, याचा प्रत्यय या संग्रहाच्या विवेचनातून येतो. या ग्रंथातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे : डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेतून बालकुमारांना नक्की काय मिळते?

या प्रश्नाचे उत्तर शोधताना प्रा. पाचारणे यांनी बालकवितेच्या मूलभूत उद्देशाकडे लक्ष वेधले आहे. कविता मुलांना फक्त हसवते का? केवळ पाठांतरासाठी असते का? की ती त्यांच्या विचारविश्वाची निर्मिती करते? डॉ. सावंत यांच्या कवितेच्या संदर्भात उत्तर स्पष्ट आहे, ही कविता बालमनाचे मनोरंजन करते, पण त्याचवेळी त्याला विचार करायला शिकवते. ती प्रश्न निर्माण करते, जिज्ञासा जागवते, निसर्गाशी मैत्री घडवते, विज्ञानाकडे आकर्षित करते, सामाजिक मूल्यांची जाणीव करून देते आणि कल्पनाशक्तीला पंख देते. बालकाला कविता समजली पाहिजे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे कवितेने बालकाला स्वतःला समजून घेण्यास मदत केली पाहिजे. डॉ. सावंत यांच्या कवितेत हे वैशिष्ट्य प्रकर्षाने आढळते. 'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' हा ग्रंथ एका कवीच्या बालकवितेचा परिचय करून देणारा ग्रंथ एवढ्यापुरताच मर्यादित नाही, तर तो मराठी बालकवितेच्या बदलत्या स्वरूपाचा, तिच्या आशयविस्ताराचा आणि आधुनिक बालमनाशी तिच्या बदलत्या नात्याचा अभ्यास करणारा दस्तऐवज आहे.

प्रा. साईनाथ पाचारणे यांच्या अनुभवसंपन्न लेखणीतून डॉ. सुरेश सावंत यांच्या कवितेतील विविध रंग, विविध गंध आणि विविध आशयछटा उलगडतात. बालकवितेला दुय्यम साहित्यप्रकार न मानता तिच्या स्वतंत्र साहित्यिक सामर्थ्याचा शोध घेण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

आजच्या डिजिटल युगात मुलांच्या हातात मोबाईल आहे, त्यांच्या डोळ्यांसमोर जगभरातील माहिती आहे; पण त्याच वेळी त्यांच्या भावविश्वाला समजून घेणारे, त्यांच्या प्रश्नांना शब्द देणारे आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला दिशा देणारे साहित्यही तितकेच आवश्यक आहे. अशा काळात डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेचा चिकित्सक अभ्यास करणारा हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा ठरतो.

बालकविता म्हणजे केवळ बालकांसाठी लिहिलेली कविता नव्हे; तर ती उद्याच्या प्रौढ माणसाची मानसिक, बौद्धिक आणि संवेदनशील पायाभरणी करणारी कविता असते. डॉ. सुरेश सावंत यांच्या कवितेने ही भूमिका समर्थपणे निभावली आहे आणि प्रा. साईनाथ पाचारणे यांच्या समीक्षेने त्या काव्यप्रवासाचे अर्थपूर्ण दस्तऐवजीकरण केले आहे. म्हणूनच 'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' हा ग्रंथ मराठी बालसाहित्याच्या अभ्यासकांनी, शिक्षकांनी, पालकांनी, साहित्यप्रेमींनी आणि विशेषतः बालकवितेचा चिकित्सक अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावा, असा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. बालमनाच्या कोवळ्या मातीत कवितेची बीजे पेरणाऱ्या डॉ. सुरेश सावंत यांच्या काव्यविश्वाचा अर्थपूर्ण शोध घेणारा आणि त्या काव्याला चिकित्सेच्या प्रकाशात उभे करणारा प्रा. साईनाथ पाचारणे यांचा हा ग्रंथ मराठी बालसाहित्याच्या दालनात निश्चितच मोलाची भर घालणारा ठरतो.

**'डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा' (समीक्षाग्रंथ)**
**लेखक : प्रा. साईनाथ पाचारणे**
**प्रकाशक : संजय सुरनर, संगत प्रकाशन, नांदेड.**
**मुखपृष्ठ : संतोष घोंगडे**
**पृष्ठे : १७६**
**किंमत रु. ३५०**
**पुस्तक परिचय :**
**पंडित पवळे, नांदेड**
**मो . ९८९०२३२९६२**

## पुन्हा नव्याने कंबर कस

पाऊस हरपला,
बाप करपला,
झाले स्वप्नांचे हासे,
पाऊस फसवतो,
बाप फसतो,
पडती उलटे फासे..
बैमान पाऊस,
ईमानदार बाप,
विरोधाभास हा दिसे,
गणित जगण्याचे,
विरोधाभासाने या,
मग जुळेल ते कसे..
पाऊस भोळा,
म्हणती सारे,
ते खोटेच असे,
पाऊस हुशार,
बाप भोळा, हे
कुणाला का न दिसे.
झाला पिकाचा पाचोळा,
जगणे झाले त्याचे चोळा मोळा,
धिंड स्वप्नांची निघालेली दिसे,
बाप बांध्यावरच बसलेला असे..
विचार मनात त्याच्या आता,
पुढच्या वर्षीचा खेळत असे,
देऊन श्रद्धांजली स्वप्नांना
या वर्षीच्या, बाप पुन्हा
नव्याने कंबर कसे,
बाप पुन्हा नव्याने कंबर कसे.

**-अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६..

# नेपाळचा जलप्रलय भारतासाठी धोक्याची घंटा!

नेपाळमध्ये अतिवृष्टी, भूस्खलन, हिमनदी फुटणे आणि अचानक आलेल्या महापुरामुळे निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. नद्या दुथडी भरून वाहत असून, अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगराळ प्रदेशातील रस्ते, पूल, घरे आणि इतर पायाभूत सुविधा पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे बाधित झाल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीने नेपाळ-समोर मोठे संकट उभे केले असले, तरी भारतासाठीही हा गंभीर इशारा आहे.



हिमालय हा केवळ नेपाळचा किंवा भारताचा भूभाग नाही; तो संपूर्ण दक्षिण आशियाच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचा आधार आहे. हिमालयातून उगम पावणाऱ्या अनेक नद्या भारत आणि नेपाळमधून वाहतात. त्यामुळे नेपाळमध्ये घडणाऱ्या हवामानविषयक घटनांचा परिणाम सीमावर्ती भारतीय भागांवर होण्याची शक्यता कायम असते. म्हणूनच नेपाळ-मधील जलप्रलयाकडे केवळ शेजारच्या देशातील आपत्ती म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.

अतिवृष्टी, ढगफुटी, हिमनद्या वितळण्याचा वाढता वेग आणि हिम-नदीतील तलाव फुटण्याच्या घटना या बदलत्या हवामानाचे गंभीर संकेत आहेत. हिमालयीन प्रदेशात तापमानवाढीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. अशा परिस्थितीत अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी खाली येते आणि नदीकाठच्या वस्त्यांना त्याचा फटका बसतो. डोंगराळ भागातील अरुंद दऱ्या आणि नदीखोऱ्यां-मध्ये हा धोका आणखी वाढतो.

नेपाळमधील या आपत्तीत भारताने मदतीचा हात पुढे करणे ही केवळ शेजारधर्माची बाब नाही, तर मानवी कर्तव्याचीदेखील आहे. आपत्तीच्या काळात अन्न, औषधे, बचाव साहित्य, पाणी, तात्पुरता निवारा आणि अन्य आवश्यक सामग्री उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर भारत आणि नेपाळने हिमालयीन प्रदेशातील आपत्ती व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी संयुक्त यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे.

विशेषतः नदीच्या पाण्याची पातळी, अतिवृष्टी, हिमनदीतील बदल आणि संभाव्य पूर याबाबत रिअल-टाइम माहितीची देवाणघेवाण झाली पाहिजे. सीमावर्ती भागातील नागरिकांना वेळेवर इशारा मिळाला, तर अनेक जीव वाचवता येऊ शकतात. केवळ आपत्ती घडल्यानंतर मदत करण्याऐवजी आपत्ती येण्यापूर्वीच सज्ज राहणे ही काळाची गरज आहे. या घटनेतून भारताने स्वतःसाठीही महत्त्वाचा धडा घेण्याची आवश्यकता आहे. हिमालयीन राज्यांमध्ये अनियंत्रित बांधकाम, नदीपात्रांवरील अतिक्रमण, डोंगर उतारांवरील बेसुमार विकास आणि पर्यावरणाचा विचार न करता उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा भविष्यात धोकादायक ठरू शकतात. विकास आवश्यक आहे; मात्र निसर्गाच्या क्षमतेचा विचार करून केलेला विकासच शाश्वत विकास ठरतो. हिमालय हा अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. येथे रस्ते, धरणे, पर्यटन प्रकल्प आणि वसाहती उभारताना पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. नदीला तिचा नैसर्गिक प्रवाह मिळणे, पूरक्षेत्रात अनावश्यक बांधकाम टाळणे, जंगलांचे संवर्धन करणे आणि डोंगर उतारांचे संरक्षण करणे याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

हवामान बदल ही आता भविष्यातील समस्या राहिलेली नाही. त्याचे परिणाम आजच जाणवत आहेत. त्यामुळे भारताने आपत्ती व्यवस्थापनाच्या पारंपरिक पद्धतींपलीकडे जाऊन पूर्वसूचना प्रणाली, उपग्रह निरीक्षण, हवामान अंदाज, नदी निरीक्षण आणि स्थानिक प्रशासनाचे प्रशिक्षण अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

नेपाळच्या आपत्तीने माणूस आणि निसर्ग यांच्यातील बिघडत चाललेला समतोल पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. संकटाच्या काळात भारताने नेपाळला सर्वतोपरी मदत करावीच; परंतु त्याचबरोबर या आपत्तीतून स्वतःच्या भविष्यासाठीही धडा घ्यावा. निसर्गाला आव्हान देऊन विकास साधता येत नाही. निसर्गाचा सन्मान करून, पर्यावरणाचे रक्षण करत आणि आपत्तीपूर्व तयारी मजबूत करत केलेला विकासच खऱ्या अर्थाने सुरक्षित विकास आहे. नेपाळच्या भीषण जलप्रलयाने भारताला दिलेला हा इशारा वेळीच समजून घेण्याची गरज आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# स्वारातीम विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ऑन-जॉब ट्रेनिंग व इंटर्नशिपच्या प्रभावी अंमलबजावणीवर कार्यशाळा





**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्य व प्रतिनिधींसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत ऑन-जॉब ट्रेनिंग व इंटर्नशिपच्या प्रभावी अंमलबजावणी आणि मार्गदर्शन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळा पार पडली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत संलग्न महाविद्यालयांमध्ये ऑन-जॉब ट्रेनिंग व इंटर्नशिप तरतुदींची प्रभावी, सुबद्ध व एकसमान अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक प्रा. एस. जे. वाढेर यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी एनईपी २०२० अंतर्गत ओजेटी व इंटर्नशिप कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण, व्यावहारिक व अनुभवात्मक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ, संलग्न महाविद्यालये, विभागप्रमुख व इतर भागधारकांनी सामूहिक जबाबदारीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर व डॉ. एच. एम. पतंगे यांनी आपापल्या विद्याशाखा अंतर्गत असणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ओजेटी/इंटर्नशिपची आवश्यकता व संधी याबाबत सादरीकरण केले. यावेळी ओजेटी क्रेडिट रचना, कालावधी, महाविद्यालये व विद्याशाखा मार्गदर्शक म्हणून भूमिका, मूल्यमापन, कागदोपत्री कार्यवाही तसेच उद्योग-शैक्षणिक सहकार्य या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यापीठ, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय संलग्न महाविद्यालयांचे क्लस्टर निर्माण करून ओजेटी व इंटर्नशिपच्या अंमलबजावणीबाबत परस्पर संवाद व शंकानिरसनासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली. मार्गदर्शक सूचनांनुसार ओजेटी व इंटर्नशिप हा अभ्यासक्रमाचा अविभाज्य घटक असून, तो १२० तासांच्या चार शैक्षणिक क्रेडिटशी संबंधित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यविकासासाठी व रोजगारक्षमतेत वाढ करण्यासाठी ओजेटी व इंटर्नशिप अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेणे आवश्यक असून, त्यांच्या उपस्थितीकडे सर्व प्राचार्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उच्च शिक्षण हे केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव, व्यावसायिक कौशल्ये व वास्तविक जीवनातील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणारे असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संलग्न महाविद्यालयांनी प्रामाणिक व समन्वित प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता, व्यावहारिक ज्ञान व एकूणच व्यावसायिक विकास सुदृढ करण्यासाठी महाविद्यालये व विद्याशाखा सदस्य यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.आणि याबाबत लवकरच विद्यापीठातर्फे सविस्तर इको सिस्टीम तयार केली जाईल असे स्पष्ट केले.

या कार्यशाळेस विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांचे सुमारे १०० प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यशाळेमुळे विद्यापीठ प्रशासन, अधिष्ठाता, प्राचार्य व उपस्थित प्रतिनिधी यांच्यात पुढील अंमलबजावणीसंदर्भात संवाद व अनौपचारिक चर्चेची संधी उपलब्ध झाली.

# चक्री रोडवरील धुळीचा त्रास संपणार; आ. हेमंत पाटील यांच्याकडून रस्ता डांबरीकरणाचे आश्वासन



**हदगाव (प्रतिनिधी)**– तालुक्यातील चक्री शिवारातील शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मौजे चक्री येथील सूर्य संहिता क्रेशर ते हदगाव-बाळापूर मुख्य रस्त्यापर्यंतच्या कच्च्या रस्त्यावरील धुळीच्या साम्राज्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला आमदार हेमंत पाटील धावून आले आहेत.

या कच्च्या रस्त्यावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या हायवा, टिप्परमुळे प्रचंड धूळ उडत होती. क्रेशर प्रशासनाकडून रस्त्यावर पाणी मारले जात नसल्याने रस्त्यालगत असलेल्या हळद, सोयाबीन, तूर या पिकांवर धुळीचे थर साचून पिकांचे मोठे नुकसान होत होते. तसेच शेतात जाणाऱ्या महिला, शेतकरी आणि दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता.

शेतकऱ्यांनी याबाबत क्रेशर प्रशासनाला अनेकदा तोंडी सांगूनही त्यांनी दुर्लक्ष केले. अखेर चक्री व कोळी शिवारातील संतप्त शेतकऱ्यांनी एकत्र येत क्रेशर कर्मचाऱ्यांना जाब विचारला, मात्र त्यांनी वेळकाढूपणा केला.

या प्रकरणाची माहिती पत्रकार दीपक सूर्यवंशी यांनी शिवसेना उपनेते तथा आमदार हेमंत पाटील यांना दिली. शेतकऱ्यांची व्यथा समजताच आ. हेमंत पाटील यांनी तत्काळ हस्तक्षेप करत क्रेशर प्रशासनाला फोनवरूनच सक्त सूचना दिल्या.

आ. हेमंत पाटील यांनी क्रेशर प्रशासनाला कच्च्या रस्त्यावर दिवसातून किमान ४ वेळा पाणी मारण्याचे आणि टिप्परची वेगमर्यादा पाळण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत.

त्याचबरोबर या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पावसाळा संपताच स्वतः निधी मंजूर करून या रस्त्याचे डांबरीकरण करून रस्ता पक्का करून देऊ, असा ठोस शब्द शिवसेना उपनेते आमदार हेमंत पाटील यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

आमदारांच्या या तात्काळ निर्णयामुळे चक्री व कोळी शिवारातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आ. हेमंत पाटील यांचे आभार मानले आहेत.

# हडको येथील साईबाबा मंदिर कमानीसाठी १० लक्ष रूपयांचा निधी; आ. बोंढारकर यांचे आश्वासन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– हडको परिसरातील साईबाबा मंदिर येथील कमानीसाठी दहा लक्ष रूपयांचा निधी देण्याचे आश्वासन नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आश्वासन दिले.

२८ ऑगस्ट रोजी हडको येथील साईबाबा मंदिर येथे दर्शनासाठी आलेल्या आ. आनंदराव पाटील बोंढारकर, माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे, युवा सेना जिल्हा प्रमुख बाळू पाटील, सिडको शहर प्रमुख सुहास पाटील खराणे यांच्यासह पदाधिकारी यांनी महाआरती केली. या वेळी मंदिर विश्वस्त मंडळ अध्यक्ष बाळू पाटील हातणीकर, भास्कर शास्त्री, श्रीकांत पांडे, कल्याणकर, संकेत गोंधाणे, श्रीनिवास गुडमेवार, चिखलीकर मावशी, कुलकर्णी, बागे यांनी सत्कार केला. यावेळी साहेबराव मामीलवाड, कृष्णा पांचाळ यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

आ. बोंढारकर यांनी यावेळी मंदिर परिसरातील मुख्य मार्गावर कमानीसाठी दहा लक्ष रुपयांच्या निधी देण्याचे आश्वासन दिले.

# युगकवी वामनदादा कर्डक व प्रतापसिंग बोदडे यांचा आज संयुक्त जयंती सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– गेली २१ वर्षापासून युग कवी वामनदादा कर्डक व व महाराष्ट्राचे प्रख्यात कवी, गायक कालवश प्रतापसिंग बोदडे यांच्या संयुक्त जयंती सोहळ्याचे रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता आयोजन केले आहे. तरी सर्व जनतेने या कार्यक्रमास हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य आयोजक संजय निवडंगे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



या कार्यक्रमाचे उद्घाटन मनपाचे गटनेते इंजि. प्रशांत इगोले यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी शंकर चंद्रे हे राहणार आहेत. तर स्वागताध्यक्ष म्हणून गौतम कदम यांची तर मुख्य अतिथी म्हणून अनिता हिंगोले, फारुख अहेमद शेखर, डॉ. रवी सरोदे, डॉ. दिलीप कंधारे आदींची उपस्थिती राहणार आहे. या जयंती महोत्सवात महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून नामवंत गायक, कलावंतांची या कार्यक्रमात हजेरी असणार आहे. सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही मान्यवरांचा तुफानातील दिवे हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे या कार्यक्रमात महाराष्ट्राचे प्रख्यात गायक सावदेकर दत्ता शिंदे, अजय देहाडे, मनोज राजा गोसावी व अन्य दिग्गज कलावंतांची उपस्थिती राहणार आहे.

# राखीच्या धाग्याने जपली सामाजिक बांधिलकी; सप्तरंग संस्थेचे अनोखे रक्षाबंधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– रक्षाबंधनाचा सण केवळ कुटुंबापुरता न ठेवता समाजातील विविध घटकांसोबत साजरा करत सप्तरंग सेवाभावी संस्थेने सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श घालून दिला. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

रक्षाबंधनानिमित्त संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी वजिराबाद पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलीस स्टेशनला भेट देऊन दिवसरात्र समाजाच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांना राखी बांधली आणि त्यांच्या सेवेला सलाम केला.



त्यानंतर खुपसरवाडी येथील निराधार आश्रमातील मुलांसोबत राखी बांधून आनंदाचे क्षण साजरे केले. या मुलांच्या आयुष्यातील भाऊ – बहिणीच्या नात्याची उणीव प्रेम आणि आपुलकीने भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.

तसेच 'भावाची आपुलकी, बहिणीच्या आरोग्याची काळजी' या भावनेतून गरजू विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप करून 'आरोग्य सुरक्षेचे रक्षाबंधन' साजरे केले. हा उपक्रम आरोग्य जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरला.

यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे, फरीदा बकश, अर्चना बकश, साक्षी मनियार, ज्योती पाटील, रागेश्री जोशी, देवयानी जोशी आदींनी सहभाग घेतला होता.

# प्रज्ञा ग्रंथालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)**– वसरणी येथील प्रज्ञा ग्रंथालयाच्या वतीने इयत्ता १० वी, १२ वी व इतर परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केशवसुत साहित्य पुरस्कार प्राप्त तथा बहुचर्चित 'बोऱ्याची गाठ' या कादंबरीचे लेखक, कवी महेश मोरे यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कथाकार ॲड. सी. आर. पंडित हे होते. 'समाजात मान, प्रतिष्ठा मिळवायची असेल तर जिद्द बाळगा, मेहनत करा' असा सोपा नि सुलभ मंत्र विद्यार्थ्यांशी हितगुज करताना कवी मोरे यांनी दिला.

कथाकार ॲड. सी. आर. पंडित यांनीही मुलांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर वेळेला महत्त्व द्या, आळसाला दूर करा, असा मौलिक सला दिला. दै प्रजावाणीचे वार्ताहर सूर्यकांत माली पाटील यांनीही



आपल्या मनोगतातून 'ग्रंथांशी मैत्री करा' तरच तुमचे भविष्य उज्ज्वल होईल असे सांगितले.

या कार्यक्रमास हरी गजभारे, संजय पाटील, राम कऱ्हाळे, अशोक गजभारे, सुदर्शन गजभारे, तुकाराम कस्तुरकर, मोहन काळे, सुरेश गजभारे, पांडू वाघमारे, संतोष मोरे, तुकाराम गजभारे आदी मान्यवरांसह विद्यार्थी मित्र उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार भानुदास पोवळे यांनी व्यक्त केले तर सूत्रसंचालन महेश गजभारे यांनी केले.

# सावरगाव नसरत येथे महादेव मंदिर संरक्षण भिंतीचे लोकार्पण

## सभामंडपासाठी २५ लाखांचा निधी देणार –आ. चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)**–लोहा तालुक्यातील सावरगाव नसरत येथील श्री महादेव मंदिराच्या संरक्षण भिंतीचे लोकार्पण आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पार पडले. याच कार्यक्रमात सभामंडपासाठी २५ लक्ष रुपयांचा निधी देण्याची घोषणा त्यांनी केली. गावाच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देऊ, असे ग्रामस्थांना आश्वासित केले

सावरगाव (न) येथील महादेव मंदिर संरक्षण भिंत लोकार्पण आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंभुलिंग महाराज उदगीरकर होते. व्यासपीठावर माजी उपसभापती बालाजी पाटील कदम, नगराध्यक्ष शरद पाटील पवार,



माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी सभापती आनंदराव पाटील ढाकणीकर, माजी कृउबा उपसभापती मारुती पाटील बोरगावकर, नगरसेवक गणेश बगाडे, सरपंच वीरभद्र राजुरे, मारोतराव सोनवळे, प्रकाश पाटील पवार, माजी उपसरपंच भारत पाटील कदम, अविनाश सूर्यवंशी, उपसरपंच पांडुरंग देवकते, माजी सरपंच माधव बेद्रे, संदीप होळगे, भानुदास पवार, गणपत बेद्रे, गणेश शेटकर, बालाजी भावे, तुळशिराम चव्हाण आदी उपस्थित होते.

आ. प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना जनतेने धडा शिकवावा. मी सामान्य कुटुंबातील सामान्य कार्यकर्ता आहे. कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. माझ्यासोबत सर्व समाजातील कार्यकर्ते आहेत. माझे राजकारण केवळ विकासाचे आहे, असे सांगून ते म्हणाले, सावरगाव नसरत येथील महादेव मंदिराच्या संरक्षण भिंतीसाठी आपण खासदार असताना लातूरचे तत्कालीन खासदार सुधाकर शृंगारे यांच्याकडे निधीसाठी विनंती केली होती. त्यांनी १५ लाख रुपयांचा निधी दिला होता. त्यातून संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झाले. या पूर्ण झालेल्या कामाचे लोकार्पण शंभुलिंग महाराज उदगीरकर यांच्या उपस्थितीत पार पडले. माझ्या कार्यकाळात गावकऱ्यांच्या विकासाच्या मागण्या पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. महादेव मंदिराच्या सभामंडपासाठी २५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली.

# नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा भाविकांसाठी महाप्रसादाचा उपक्रम



**माहूर (प्रतिनिधी)**– माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी स्वर्गीय आमदार प्रदीप नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले. यावेळी सुमारे ५ क्विंटल मसालाभात व्हेज बिर्याणीचे भाविकांना वाटप करण्यात आले.

नवरात्र उत्सव, दत्त जयंती, ईद-ए-मिलादुन्नबी, गणेश विसर्जन तसेच सरकार सोना पीर बाबा उरूस आणि शहरातील विविध यात्रा व धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, महाप्रसाद, उपवासासाठी खिचडी आदी उपक्रम नगराध्यक्ष दोसानी यांच्या माध्यमातून राबविण्यात येतात.

यावेळी उपनगराध्यक्ष नानाभाऊ लाड, नगरपालिका अकॉउंटंट मरेवाड, ओएस गजलवाड, नगरसेविका प्रतिनिधी आकाश कांबळे, अफसर अली, विशाल ढोरे, सुमित खडसे, पत्रकार गजानन भारती, बालाजी कोंडे, राजू ठाकूर, निलेश बनसोडे, रफिक भाई, गणेश जाधव, सुनील आडे, विजय शिंदे आदी उपस्थित होते.

# ऑपरेशन यात्री सुरक्षाअंतर्गत ५ संशयित ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– वरिष्ठ मंडल सुरक्षा आयुक्त नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे मालमत्तेची चोरी तसेच प्रवाशांशी संबंधित गुन्हे रोखण्यासाठी नांदेड विभागाकडून गुप्त माहितीच्या आधारे निगराणी आणि समन्वित कारवाया अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत, प्रवाशांची चोरी व इतर गुन्ह्यांपासून सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी RPF, CIB/DI/नांदेड मंडल CPDS आणि लोहमार्ग पोलीस यांच्या संयुक्त पथकांनी दि. २५ आणि २६ ऑगस्ट २०२६ रोजी नांदेड व परभणी रेल्वे स्थानकांवर निगराणी मोहीम राबविली.

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सुमारे १९:३० वाजता, CIB/DI/नांदेड आणि लोहमार्ग पोलीस, नांदेड यांच्या संयुक्त पथकाने नांदेड रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. १ वर शिवाजीनगर, नांदेड येथील अक्षय वय २१ वर्षे याला ताब्यात घेतले.



त्याची अंगझडती घेतली असता अंदाजे ५९ हजार रुपये किमतीचे ५ संशयित चोरीचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने हे मोबाईल फोन विविध रेल्वेगाड्यांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून तसेच नांदेड रेल्वे स्थानकावरून चोरी केल्याची माहिती दिली.

सदर संशयित व्यक्ती व जप्त मालमत्ता लोहमार्ग पोलीस यांच्या ताब्यात देण्यात आली. लोहमार्ग पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १२४ अंतर्गत NCR क्र. ५७०/२०२६ नोंदवून पुढील तपास सुरू केला.

बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता, CIB/DI/ नांदेड मंडल CPDS आणि लोहमार्ग पोलीस यांच्या संयुक्त पथकाने परभणी येथील २७ वर्षीय शेख मतीन याला परभणी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ०१ वर, गाडी क्र. १७६६२ नगरसोल-काचीगुडा एक्स्प्रेसच्या थांब्यादरम्यान ताब्यात घेतले.

प्रवाशांकडून चोरी करण्याचा कथित प्रयत्न करत असताना त्याला पकडण्यात आले. त्याला लोहमार्ग पोलीस/परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले. लोहमार्ग पोलीस/परभणीने महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अंतर्गत NCR क्र. १८५/२०२६ नोंदविला.

सुमारे १४:०० वाजता, CIB-DI/नांदेड आणि लोहमार्ग पोलीस यांच्या संयुक्त पथकाने नांदेड रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. ०१ येथील जनरल वेटिंग हॉलमध्ये नाशिक येथील गजानन, वय ३४ वर्षे, याला ताब्यात घेतले.

# मुंबईतील १ सप्टेंबरच्या ओबीसी एल्गार महामोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा –नामदेवराव आयलवाड



**नांदेड (प्रतिनिधी)**– ओबीसी विरोधी शासनाकडून ओबीसींची डीएनए तपासणी करण्याच्या प्रयत्नांविरोधात आणि ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली १ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रालयावर निघणाऱ्या ओबीसी एल्गार महामोर्चात ओबीसी समाजाने हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड यांनी आयोजित केलेल्या एका पत्रकार परिषदेत केले आहे.

या महामोर्चाच्या प्रमुख मागण्या अशा– हैदराबाद गॅझेट रद्द करा, हैदराबाद गॅझेटद्वारे दिलेले २२ लाख २० हजार ५७७ मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रे आणि जात वैधता प्रमाणपत्रे त्वरित रद्द करा, ओबीसी विरोधी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती रद्द करा, ओबीसी विद्यार्थ्यांचे शाळा-कॉलेजमधील २७ टक्के शैक्षणिक आरक्षण कायम ठेवून, महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती द्या आणि प्रत्येक तालुकास्तरावर सर्व सुविधायुक्त वसतिगृहे सुरू करा आदी मागण्या करण्यात येणार आहेत.

या पत्रकार परिषदेला ओबीसी नेते विजयकुमार देवडे, इंजि. लक्ष्मणराव लिंगापुरे, दत्ताजी मोहिते, संदीप जिल्लेवाड, सतीश देशमुख, मनोज यादव, राजू यादव, बी. के. पाटील कोटेकलूरकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**नायगाव प्रतिनिधी (प्रतिनिधी)** –लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी नायगाव तालुक्यातील मौजे कुंचेली येथे विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक श्रीनिवास पाटील चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले.

जयंती सोहळ्याच्या निमित्ताने गावातील मातंग समाज बांधवांनी स्मशानभूमी, समाजमंदिर आणि अंतर्गत रस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रा. मनोहर तोटरे यांचे लक्ष वेधले. गावातील मूलभूत सुविधांचा अभाव दूर करून विकासकामांना गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

ग्रामस्थांच्या मागण्यांची दखल घेत प्रा. मनोहर तोटरे यांनी कुंचेलीच्या विकासकामांसाठी पुढाकार घेण्याचे



आश्वासन दिले. गावातील प्रश्नांबाबत आमदार राजेश पवार तसेच पुनमताई पवार यांच्याशी लवकरच चर्चा करून आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल. प्रशासनाच्या माध्यमातून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू, अशी ग्वाही तोटरे यांनी दिली असल्याने आमदार राजेश पवार व पुनमताई पवार यांनी सांगितले.


त्यांचे अतिशय विश्वासू म्हणून नायगाव तालुक्यात ओळख असलेले तोटरे यांनी दिलेल्या शब्दाला आमदार नक्कीच हो भरतील व कुंचेली गावातील कामे होतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहेत. गावच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन मिळाल्याने मातंग समाज बांधवांसह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी प्रा. तोटरे यांचे आभार मानले.

कार्यक्रमास सरपंच मनोहर तोटरे, ज्येष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर, कैलास तेलंग, माधवराव पाटील घाटोळे, सरपंच गोविंद पाटील डाकोरे, पंडित पाटील बसवदे, गुणवंत पाटील डाकोरे, सुदाम पाटील होणराव, भुजंग पाटील होणराव, बालासाहेब येरवडे, माजी सरपंच बालाजी जाधव, बाबू सय्यद, हनमंत पाटील यांच्यासह जयंती मंडळाचे पदाधिकारी गुंडाजी बोयाळ, बाबू बोयाळ, साहेबराव बोयाळ, दत्ता बोयाळ, उद्धव बोयाळ, लक्ष्मण बोयाळ, अशोक बोयाळ आदी उपस्थित होते.

# चंदेरी

## ‘नोरा फतेही दिवसातून दहा वेळा फोन करायची’

### जॅकलिनसोबतचे नाते तोडण्यास सांगितल्याचा सुकेश चंद्रशेखरचा दावा



**तुरुंगात असलेला कथित ठग सुकेश चंद्रशेखर याने अभिनेत्री नोरा फतेही हिच्याबाबत गंभीर आरोप केल्याचे समोर आले आहे. सुकेशच्या नावाने नोरा फतेहीला उद्देशून लिहिलेले एक कथित हस्तलिखित पत्र समाजमाध्यमांवर चर्चेत आले असून, त्यामध्ये त्याने नोरा, अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिससोबतचे त्याचे कथित संबंध, महागड्या वस्तू आणि पैशांच्या व्यवहारांबाबत अनेक दावे केले आहेत. मात्र, या पत्रातील आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. सुकेशने पत्रात दावा केला आहे की, मोरोक्कोतील कॅसाब्लांका येथे घर खरेदी करण्यासाठी त्याने नोराला कोट्यवधी रुपये दिले होते. तसेच बर्किन बॅग, बीएमडब्ल्यू आणि रेंज रोव्हर यांसारख्या महागड्या वस्तूंबाबत नोरासोबत व्हॉट्सॲपवर चर्चा झाल्याचेही त्याने म्हटले आहे.**

» जॅकलिनसोबतच्या नात्यावरून नोरा अस्वस्थ होती? : सुकेशच्या कथित पत्रातील मोठा भाग त्याचे अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिससोबत असलेल्या कथित नात्याबाबत आहे. त्याचा दावा आहे की, या नात्यामुळे नोरा अस्वस्थ होती आणि ती वारंवार त्याच्याशी संपर्क साधत होती. नोरा दिवसातून दहा वेळापर्यंत फोन करायची आणि जॅकलिनसोबतचे नाते संपविण्याची मागणी करायची, असा आरोप सुकेशने केला आहे. आपल्या जीवनशैलीसाठी पैसे देण्याची मागणीही नोरा करत असल्याचा दावा त्याने पत्रात केल्याचे वृत्त आहे. तथापि, हे सर्व दावे सुकेशचे असून त्यांना स्वतंत्र पुष्टी मिळालेली नाही.

» ‘पुरावे माझ्याकडे आहेत’, सुकेशची धमकी : कथित पत्राच्या शेवटी सुकेशने नोराला इशारा दिल्याचे वृत्त आहे. आपल्याकडे आणखी काही पुरावे असल्याचा दावा करत ते सार्वजनिक केल्यास नोराची प्रतिमा सांभाळण्यासाठी केलेले कोणतेही प्रयत्न तिला वाचवू शकणार नाहीत, असा इशारा त्याने दिल्याचे सांगितले जाते. या कथित पत्रामुळे सुकेश आणि नोरा यांच्यातील जुन्या संबंधांबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

» २०० कोटींच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सुकेश आरोपी : सुकेश चंद्रशेखर हा २०० कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराशी संबंधित प्रकरणात आरोपी असून, तो सध्या तुरुंगात आहे. त्याच्यावर प्रभावशाली व्यक्तींची नावे वापरून फसवणूक केल्याचे आरोप आहेत. त्याचे नाव यापूर्वीही बॉलिवूडमधील काही अभिनेत्रींशी जोडले गेले आहे. दरम्यान, नोरा फतेहीने या प्रकरणात यापूर्वी स्वतः कोणतेही गैरकृत्य केले नसल्याचे सांगितले असून, आपण या प्रकरणातील पीडित असल्याचा दावा केला आहे. सुकेशच्या या कथित नव्या पत्रावर नोराकडून अद्याप कोणतीही नवी प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

## इमरान हाश्मी यांना स्वाइन फ्लू

### H1N1 चाचणी पॉझिटिव्ह, डॉक्टरांचा विलगीकरणाचा सल्ला; बंगळुरूतील कार्यक्रम रद्द

**अभिनेता इमरान हाश्मी यांना स्वाइन फ्लूची लागण झाली आहे. त्यांची H1N1 चाचणी पॉझिटिव्ह आली असून, डॉक्टरांनी त्यांना विलगीकरणात राहण्याचा तसेच पुरेशी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे इमरान यांनी बंगळुरू येथील नियोजित कार्यक्रमही रद्द केला आहे.**

इमरान हाश्मी सध्या ‘आवारापन २’च्या यशामुळे चर्चेत आहेत. काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. व्यावसायिक कामानिमित्त ते नुकतेच रांची येथे गेले होते. तेथून परतल्यानंतर प्रकृती अस्वास्थ्य जाणवत असल्याने त्यांनी वैद्यकीय तपासणी करून घेतली. या तपासणीत H1N1 विषाणूची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. इमरान यांनी काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर एक पोस्ट करून आपली प्रकृती ठीक नसल्याची माहिती दिली होती. प्रकृती अस्वास्थ्यामुळे बंगळुरू येथील कार्यक्रमाला उपस्थित राहता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र, त्यावेळी आपल्याला स्वाइन फ्लू झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले नव्हते. इमरान यांनी पोस्टमध्ये चाहत्यांना संबोधित करताना कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे सांगितले होते. बंगळुरूतील सनबर्न युनियन येथे १२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या नव्या तारखेच्या कार्यक्रमासाठी आधीची तिकिटे ग्राह्य राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**रांचीहून परतल्यानंतर वैद्यकीय तपासणी**

वृत्तानुसार, इमरान व्यावसायिक कामांसाठी सातत्याने प्रवास करत होते. नुकतेच ते रांची येथे गेले होते. तेथे काही कामे पूर्ण करून परतल्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर करण्यात आलेल्या वैद्यकीय तपासणीत H1N1 चाचणी पॉझिटिव्ह आली. इमरान सध्या त्यांच्या आगामी ‘G9’ या चित्रपटाच्या चित्रीकरणातही व्यस्त होते. या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. मात्र, प्रकृतीच्या कारणास्तव सध्या त्यांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विश्रांती घ्यावी लागणार आहे.

**‘आवारापन २’च्या यशामुळे चर्चेत**

दरम्यान, इमरान हाश्मी यांच्या कारकिर्दीत सध्या ‘आवारापन २’ हा चित्रपट चर्चेचा विषय ठरला आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केल्याचे वृत्त आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, चित्रपटाने १५ दिवसांत देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर सुमारे १७३.३० कोटी रुपयांची स्थूल कमाई केली असून, निव्वळ कमाई १४५.४५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जगभरातील एकूण स्थूल कमाई सुमारे २०५.३५ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. सध्या इमरान हाश्मी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार विलगीकरणात असून, प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी विश्रांती घेत आहेत.

## ट्रोल्सच्या कमेंट्सना उत्तर देत नाही...

### अभिनेत्री रुखसार रहमानची खास मुलाखत; वडिलांप्रमाणेच आयएएस अधिकारी होण्याचे होते स्वप्न

**अभिनेत्री रुखसार रहमान यांनी हिंदी चित्रपटसृष्टीसह विविध चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. वयाच्या अवघ्या १६-१७व्या वर्षी त्यांना अभिनेत्री होण्याची संधी मिळाली. मात्र, विशेष म्हणजे त्यांचे बालपणीचे स्वप्न अभिनेत्री होण्याचे नव्हते. वडील आयएएस अधिकारी असल्याने त्यांच्याप्रमाणेच आपणही प्रशासकीय सेवेत जावे, असे रुखसार यांना वाटत होते. मात्र, नियतीने त्यांना अभिनयाच्या क्षेत्रात आणले. अलीकडेच त्या ‘उत्तर दा पुत्तर’नंतर ‘बटवारा’ या चित्रपटातही दिसल्या. यानिमित्ताने त्यांनी आपल्या कारकिर्दीपासून ते समाजमाध्यमांवरील ट्रोलिंगपर्यंत अनेक विषयांवर मनमोकळेपणाने संवाद साधला.**



» वडिलांप्रमाणे आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न : आपल्या आयुष्यातील पहिले स्वप्न सांगताना रुखसार म्हणाल्या, “माझे वडील आयएएस अधिकारी होते. ते शहर अधिकारी म्हणून काम करत होते. त्यांचा रुबाब आणि समाजातील स्थान पाहून मलाही त्यांच्यासारखे आयएएस अधिकारी व्हावे, अशी लहानपणापासून इच्छा होती. त्या काळात आयएएस परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध असायच्या. मी नववीपासूनच त्यांचा अभ्यास सुरू केला होता. “मात्र, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. नववीचे शिक्षणही पूर्ण झाले नव्हते आणि मला पहिल्या चित्रपटाची ऑफर मिळाली. त्यानंतर मी अभिनेत्री झाले. यामागची कथा खूप मोठी आहे. मात्र, आज मी तुमच्यासमोर अभिनेत्री म्हणून आहे.”

» ट्रोल्सना उत्तर देण्याऐवजी दुर्लक्ष : समाजमाध्यमांवरील ट्रोलिंगला कसे सामोरे जाता, असे विचारले असता रुखसार म्हणाल्या, “मी ट्रोल्सकडे दुर्लक्ष करणे पसंत करते. मी अनेक वर्षांपासून केवळ इन्स्टाग्रामवर सक्रिय आहे. एक काळ असा होता की, माझ्या खासगी आयुष्यावरून मला मोठ्या प्रमाणावर ट्रोल करण्यात आले आणि अपशब्दही वापरण्यात आले. “माझी आजी नेहमी म्हणायची, ‘एक चूप सौ को हराता है.’ मीही तेच केले. मी कधीही कोणत्याही ट्रोलला उत्तर दिले नाही. हळूहळू ते स्वतःच कंटाळून थांबले. अधूनमधून



एखादा-दुसरा ट्रोल समोर येतो; मात्र, आजही मी त्याला कोणतीही प्रतिक्रिया देत नाही.”

» कपाळावरच्याटिकलीवरहीप्रश्नउपस्थित करतात... : समाजमाध्यमांवरील टीकेबाबत रुखसार म्हणाल्या, की गंमत म्हणजे अनेक वर्षांपासून तेच प्रश्न आणि त्याच प्रकारच्या गोष्टी पुन्हा पुन्हा बोलल्या जात आहेत. फक्त शब्द आणि भाषा बदलली आहे. कधी त्यांना माझ्या कपाळावरील टिकलीवर आक्षेप असतो, तर कधी डोक्यावर ओढणी घेतल्यावर प्रश्न उपस्थित केला जातो. “आपल्या कृतींबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार त्यांना आहे, असे त्यांना वाटते. मात्र, मी एक अभिनेत्री आहे आणि माझे आयुष्य माझ्या पद्धतीने जगते. मी भारतीय मुस्लिम आहे. सामाजिक पातळीवर मी काय करते, ही माझी जबाबदारी आहे. धर्म हा माझ्यासाठी अत्यंत वैयक्तिक विषय आहे. माझी खरी जबाबदारी परमेश्वराप्रती आहे आणि त्याचा हिशेब मला अन्य कोणालाही द्यायचा नाही.” रुखसार यांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे समाजमाध्यमांवरील ट्रोलिंगला त्या कशा सामोरे जातात, याची झलक त्यांच्या मुलाखतीतून मिळते. अभिनेत्री होण्यापूर्वी आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या रुखसार यांनी अभिनय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### छोटा व्हिडिओ कापून चुकीच्या पद्धतीने प्रसारित केला जातो...

समाजमाध्यमांवर रुखसार सक्रिय असतात. मात्र, तेथे होणाऱ्या ट्रोलिंगचा अनुभव कसा आहे, याबाबत त्या म्हणाल्या, “सुमारे वर्षभरापूर्वी समाजमाध्यमांशी संबंधित मला अतिशय वाईट अनुभव आला. यापूर्वीही कलाकारांच्या मुलाखतीतील वक्तव्ये तोडून-मोडून सादर केली जात होती. मात्र, आता व्हिडिओच्या युगात परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. “मुलाखतीतील प्रश्नांची उत्तरे चुकीच्या पद्धतीने सादर करून लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. मी एक म्हणाले होते आणि ते पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने सादर करण्यात आले. माझ्या पॉडकास्टमधील एका छोट्या भागाचे चुकीच्या पद्धतीने संपादन करून तो प्रसारित करण्यात आला. त्या संपादन करणाऱ्याला मी उपरोधाने सलामच करू इच्छिते.” रुखसार पुढे म्हणाल्या, “त्यानंतर समाजमाध्यमांवर कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पडला. ‘हिला मनोरुग्णालयात दाखल केले पाहिजे’, ‘ही वेडी झाली आहे’, अशा प्रतिक्रिया देण्यात आल्या. मात्र, ज्या पॉडकास्टमधील हा भाग होता, तो पूर्ण पॉडकास्ट प्रसिद्ध झाला तेव्हा मी जे काही बोलले होते ते अगदी योग्य पद्धतीने आणि कोणताही विपर्यास न करता दाखवण्यात आले होते.”

## स्टारडमच्या जोरावर कलाकार दीर्घकाळ टिकू शकत नाहीत; अभिनय कौशल्यावर पकड आवश्यक

**अभिनेता अतुल मोंगिया यांची विशेष मुलाखत**

**गेल्या अडीच दशकांपासून बॉलिवूडमधील कलाकारांना अभिनयाचे प्रशिक्षण देणारे प्रसिद्ध अभिनय प्रशिक्षक अतुल मोंगिया यांनी बदलत्या चित्रपटसृष्टीबाबत महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. आजच्या काळात केवळ लोकप्रियता आणि स्टारडमच्या जोरावर कलाकारांना दीर्घकाळ यशस्वी होता येणार नाही. त्यासाठी अभिनयकौशल्य, मेहनत आणि स्वतःच्या कलागुणांवर सातत्याने काम करणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत आहे. अतुल मोंगिया यांनी अभिनेत्री आलिया भट्ट, दीपिका पदुकोण आणि अभिनेता रणवीर सिंह यांच्यासह अनेक कलाकारांना त्यांच्या भूमिकांसाठी प्रशिक्षण दिले आहे. अभिनयाचे प्रशिक्षण का आवश्यक आहे, आजच्या कलाकारांकडून प्रेक्षकांच्या काय अपेक्षा आहेत आणि मोठ्या कलाकारांमध्ये नेमके कोणते विशेष गुण आहेत, याबाबत त्यांनी मनमोकळेपणाने संवाद साधला.**



### प्रतिभेपेक्षा मेहनतही तितकीच महत्त्वाची

अभिनय हा अंगभूत गुण आहे, असे म्हटले जाते. मग प्रशिक्षण घेऊन कोणतीही व्यक्ती अभिनेता बनू शकते का, असा प्रश्न विचारल्यावर अतुल म्हणाले, “हा निश्चितच चर्चेचा विषय आहे. मात्र, माझ्या मते एखाद्या व्यक्तीमध्ये अभिनयाची आवड आणि अभिनेता होण्यासाठी आवश्यक असलेले काही मूलभूत गुण असतील, तर ती व्यक्ती अभिनेता होऊ शकते. हे गुण आपण आपल्या आयुष्यात विकसित करू शकतो आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यावर कामही करू शकतो. त्यामुळे काही कलाकार जन्मतःच प्रतिभावान असतात, हे खरे; पण अभिनय शिकताही येतो. मी दोन्ही प्रकारची उदाहरणे पाहिली आहेत. अनेकदा अत्यंत प्रतिभावान व्यक्ती मेहनत करत नाहीत. त्यामुळे त्यांची कारकीर्द अल्पकाळ टिकते किंवा त्यांना सुरुवातही करता येत नाही. याउलट काही व्यक्तींमध्ये सुरुवातीला फारशी प्रतिभा नसते; मात्र, मेहनत करून आणि अभिनयावर सातत्याने काम करून त्या अधिक चांगल्या कलाकार बनतात. त्यामुळे प्रतिभा आणि मेहनत या दोन्ही गोष्टी एकत्र अस्तित्वात असतात. अभिनयाचे प्रशिक्षण घेतल्याशिवाय कोणी अभिनेता होऊच शकत नाही, असेही मी म्हणणार नाही. एखादा चांगला दिग्दर्शक मिळाला आणि कलाकाराने चित्रीकरणाच्या वेळी काम करत-करत शिकले, तरी तो चांगला अभिनेता होऊ शकतो.

### दीपिका, रणवीर यांना अभिनय शिकवण्याची गरज नाही

दीपिका पदुकोण, आलिया भट्ट आणि रणवीर सिंह यांसारख्या कलाकारांना अतुल मोंगिया यांनी त्यांच्या भूमिकांसाठी प्रशिक्षण दिले आहे. या कलाकारांमध्ये असे कोणते विशेष गुण आहेत, जे त्यांना स्टार बनवतात, आणि प्रशिक्षणादरम्यान आपण त्यांच्यात काय नवीन भर घालता, यावर ते म्हणाले, की हे सर्व कलाकार स्टार आहेत, कारण त्यांच्याकडे प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे आणि ते उत्तम अभिनेते आहेत. ते माझ्यासोबत काम करतात म्हणून स्टार झालेले नाहीत. मात्र, एखादा बाहेरील व्यक्ती कलाकारासोबत काम करत असेल, तर व्यक्तिरेखेकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन मिळतो. ती व्यक्तिरेखा शोधण्याची नवी पद्धत मिळते. माझे काम कलाकाराला वेगवेगळ्या मार्गांनी त्या व्यक्तिरेखेपर्यंत घेऊन जाणे हे आहे. मी त्यांच्यासोबत काम केले नसते तर चित्रपटातील त्यांचा अभिनय खराब झाला असता किंवा ते व्यक्तिरेखेत



शिरू शकले नसते, असे अजिबात नाही. मात्र, माझ्या कामामुळे त्यांना काही अतिरिक्त फायदा होत असेल, तर ते निश्चितच चांगले आहे. हे सर्व अत्यंत अनुभवी कलाकार आहेत. मला त्यांना अभिनय शिकवायचा नसतो. आम्ही केवळ त्यांना काही विशिष्ट परिस्थितींमध्ये ठेवतो, ज्यामुळे त्यांना आपल्या व्यक्तिरेखेचा अधिक चांगल्या पद्धतीने शोध घेता येतो आणि ती समजून घेणे सोपे जाते. अतुल मोंगिया यांच्या मते, बदलत्या काळात प्रेक्षकांची अभिरुची आणि अपेक्षा झपाट्याने बदलत आहेत. त्यामुळे कलाकारांसाठी केवळ लोकप्रिय चेहरा असणे पुरेसे राहिलेले नाही. दीर्घकाळ टिकण्यासाठी सातत्याने आपल्या अभिनयकौशल्यावर काम करणे, वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारण्याची क्षमता विकसित करणे आणि प्रत्येक भूमिकेला नव्या दृष्टिकोनातून सामोरे जाणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे.

### पूर्वी स्टारडमला महत्त्व...

बॉलिवूडमध्ये सलमान खान, अक्षय कुमार, जॅकी श्रॉफ, गोविंदा यांसारखे अनेक कलाकार कोणताही औपचारिक अभिनय अभ्यासक्रम किंवा प्रशिक्षण न घेता सुपरस्टार झाले. मग आज अभिनय शिकणे कितपत आवश्यक आहे, असा प्रश्न विचारला असता अतुल मोंगिया म्हणाले, “हे सर्व कलाकार आता पन्नाशीच्या पुढे आहेत. नव्वदच्या दशकापर्यंत बॉलिवूडमध्ये कलाकारांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची विशिष्ट शैली आणि स्टारडम यावर त्यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात ठरत असे. “मात्र, आजच्या कलाकारांकडे पाहिले तर केवळ एखाद्या विशिष्ट शैलीमुळे ते स्टार झाले आहेत, असे म्हणता येणार नाही. काही अपवाद वगळता आजचे जवळपास ७० टक्के स्टार कलाकार वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारत आहेत. ते स्वतःमध्ये शारीरिक आणि मानसिक पातळीवरही बदल घडवून आणतात. त्यामुळे एखाद्या कलाकाराची एकच ठरावीक शैली आहे, असे म्हणता येत नाही.”

### ‘आज अभिनयात दम असेल तरच कलाकार स्टार’

अतुल यांच्या मते, चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांमध्ये मोठा बदल झाला आहे. ते म्हणाले, की आज प्रेक्षक जागतिक चित्रपट पाहत आहेत. त्यामुळे त्यांची समज आणि अपेक्षा दोन्ही वाढल्या आहेत. त्यांना कलाकारांनी केवळ एका विशिष्ट शैलीत अभिनय करण्यापेक्षा त्यापलीकडे जाऊन काहीतरी वेगळे दाखवावे, असे वाटते. आज प्रामुख्याने तेच कलाकार चांगले काम करत आहेत, जे आपल्या प्रतिभेवर, मेहनतीवर आणि कौशल्यावर सातत्याने काम करतात. आता केवळ स्टारडमवर अवलंबून राहता येणार नाही. एका टप्प्यानंतर प्रेक्षकच विचारतील, ‘आम्ही तुम्हाला का पाहावे?’

### अभिनयातील बदलाचे मोठे श्रेय आमिर खान यांना



चित्रपटसृष्टीतील अभिनयाच्या पद्धतीत झालेल्या बदलाचे मोठे श्रेय अभिनेता आमिर खान यांना दिले पाहिजे, असे अतुल मोंगिया म्हणतात. पूर्वीचे कलाकार वर्षाला पाच-सहा चित्रपट करत असत. इतकेच नव्हे, तर एका दिवसात तीन वेगवेगळ्या चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी तीन सत्रांत काम केले जात असे. अनेकदा कलाकारांना चित्रीकरणाच्या ठिकाणीच पटकथा दिली जात असे. अशा परिस्थितीत कलाकारांनी आपल्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे शिरावे, अशी अपेक्षा करणे कठीण होते. काळानुसार परिस्थिती बदलली. याचे बरेचसे श्रेय आमिर खान यांना जाते. त्यांनी एका टप्प्यावर वर्षातून एकाच चित्रपटात काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पुढील पिढीतील कलाकारांनीही ही पद्धत स्वीकारली. त्याचा परिणाम आपल्या चित्रपटांवरही झाला. चित्रपट निर्मात्यांनाही अभिनय कार्यशाळेचे महत्त्व समजू लागले. कारण चित्रीकरण सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पैसा गुंतलेला असतो. त्यामुळे कलाकाराने आधीच व्यक्तिरेखा समजून घेतली आणि तिच्यात पूर्णपणे शिरून तो चित्रीकरणाला आला, तर वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होते.

# आई तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला ११ ऑक्टोबरपासून प्रारंभ

**तुळजापूर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रासह देशभरातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्रोत्सव यंदा ११ ते २७ ऑक्टोबर दरम्यान अतिशय उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा होणार आहे. या १५ दिवसांच्या सोहळ्यात घटस्थापनेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

**मंचकी निद्रेने होणार शारदीय उत्सवाची सुरुवात**

मुख्य नवरात्रोत्सवापूर्वी ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळपासून तुळजाभवानी मातेच्या मंचकी निद्रेस प्रारंभ होईल. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी पहाटे देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना, दुपारी घटस्थापना आणि रात्री छबिना मिरवणूक निघेल, ज्यामुळे अधिकृत नवरात्रोत्सवाला सुरुवात होईल.



**नवरात्र महोत्सवाची मुख्य कार्यक्रम पत्रिका**

१२ ते १४ ऑक्टोबर: देवीची नित्योपचार पूजा व रात्री छबिना मिरवणूक, १५ ऑक्टोबर (ललिता पंचमी): दुपारी रथ अलंकार महापूजा व रात्री छबिना मिरवणूक, १६ ऑक्टोबर: मुरली अलंकार पूजा व रात्री छबिना मिरवणूक, १७ ऑक्टोबर: शेषशाही अलंकार पूजा व रात्री छबिना मिरवणूक, १८ ऑक्टोबर: भवानी तलवार अलंकार पूजा व रात्री छबिना मिरवणूक, १९ ऑक्टोबर (दुर्गाष्टमी): महिषासुर मर्दिनी अलंकार पूजा, वैदिक होम-हवन आणि रात्री छबिना मिरवणूक, २० ऑक्टोबर (विजयादशमी/दसरा): दुपारी १२ वाजता होमावरील धार्मिक विधी, घटोत्थापन आणि रात्री नगरहून येणाऱ्या पलंग, पालखीची मिरवणूक, २१ ऑक्टोबर: पहाटे सीमोल्लंघन सोहळा आणि त्यानंतर देवीची मंचकी निद्रा.

सीमोल्लंघन सोहळ्यानंतर २१ ऑक्टोबर रोजी सकाळी माता नगरच्या पलंगावर विसावणार आहे. सलग ५ दिवसांच्या मंचकी निद्रेनंतर २६ ऑक्टोबर रोजी पहाटे तुळजाभवानी मातेची पुन्हा सिंहासनावर प्रतिष्ठापना केली जाईल. याच दिवशी दुपारी सोलापूरच्या शिवलाड तेली समाजाच्या मानाच्या काठ्यांचे शहरात आगमन होणार असून, रात्री सोलापूरच्या काठ्यांसह भव्य छबिना मिरवणूक काढली जाईल. तसेच २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा साजरी केली जाणार आहे.

या उत्सवासाठी महाराष्ट्रासह शेजारच्या आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यातूनही मोठ्या संख्येने भाविक तुळजापुरात दाखल होतात. भाविकांच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे.

# मनोज जरांगेंना साथ द्यायला निघालेल्या मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने रस्त्यातच मृत्यू



**बीड(प्रतिनिधी)**–मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी जात असलेल्या बीड जिल्ह्यातील एका आंदोलकाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सुग्रीव बापू शिंदे असे या आंदोलकाचे नाव असून ते केज तालुक्यातील नांदुर घाट येथील रहिवासी आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सराटी आंतरवाली येथे आजपासून उपोषण सुरू केले असून त्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी सुग्रीव शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसह सराटी अंतरवालीकडे जात होते, गेवराई जवळ त्यांचे वाहन आले असताना त्यांना हृदयविकाराचा धक्का आला आणि यातच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे.

सुग्रीव बापू शिंदे (रा. नांदुर घाट, ता. केज, जि. बीड) असे या मृत आंदोलकाचे नाव आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवेली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यात सहभागी होण्यासाठी सुग्रीव शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत वाहनाने सराटी अंतरवेलीकडे निघाले होते. मात्र, गेवराईजवळ गाडी आली असता त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला, अशी माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली आहे.

ट्रॅक्टर, रिक्षा घेऊन धाराशिवमधून मराठा बांधव अंतरवालीच्या दिशेने रवाना झाले आहेत. मनोज जरांगे पाटलांचा जीव आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचा, या आमच्या मनातील भावना आहेत म्हणूनच आम्ही आंतरवालीकडे निघालो आहे, असं मराठा बांधव म्हणत आहेत. सरकारनं ५८ लाख नोंदी दिल्या, पण आता जात पडताळणी होत नाही, अशी भावना देखील त्यांनी व्यक्त केली. आम्ही मराठा कार्यकर्ते नाहीत तर विद्यार्थी आहोत, फक्त आरक्षणा-मुळे स्पर्धा परीक्षेत यश मिळत नाही, अशी खंत देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली. मनोज जरांगे पाटील सांगतील तो निर्णय आम्हाला मान्य त्यासाठी आम्ही आंतरवालीकडे निघालो असल्याचंही मराठी बांधव सांगत आहेत.

तर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून जालन्यातील अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे. मागण्या मान्य न झाल्यास थेट मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी मराठा समाजाला रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले, तसेच आंदोलनापासून दूर राहणाऱ्या राजकीय नेत्यांना कडक शब्दांत इशारा दिला.

# यूजीसी नेट जून २०२६ चा निकाल जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – यूजीसी नेट जून २०२६ चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएने शुक्रवारी रात्री ८४ विषयांचे निकाल जाहीर केले. उमेदवारांना आपला निकाल आणि स्कोअरकार्ड अधिकृत वेबसाइटवर पाहता आणि डाउनलोड करता येणार आहे. उमेदवारांना ugcnet.nta.nic.in या अधिकृत वेबसाइटवर लॉगिन करून स्कोअरकार्ड डाउनलोड आणि प्रिंट करता येईल. मात्र, इंग्रजी, कॉमर्स आणि समाजशास्त्र या तीन विषयांची परीक्षा तांत्रिक कारणांमुळे पुन्हा घेतली जाणार असल्याने या विषयांच्या उमेदवारांचा निकाल सध्या जाहीर करण्यात आलेला नाही.



एनटीएने दिलेल्या माहितीनुसार इंग्रजी, कॉमर्स आणि समाजशास्त्र या तीन विषयांचे निकाल सध्या रोखण्यात आले आहेत. तांत्रिक कारणांमुळे या विषयांची परीक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या तीन विषयांची फेरपरीक्षा ९ आणि १० सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांनी सध्या स्कोअरकार्ड पाहण्याचा प्रयत्न केल्यास Invalid pplication Number or Password असा एरर मेसेज दिसू शकतो. या उमेदवारांचा निकाल फेरपरीक्षा पूर्ण झाल्यानंतर जाहीर केला जाणार आहे.

# लातुरात मटका व जुगार अड्ड्यांवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाच्या धाडी; ३१ आरोपींविरुद्ध कारवाई, ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

सदर पथकाने, दि. २८ ऑगस्ट रोजी भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत, गुळखेडा येथे बालाजी सुरवसे याचे पत्र्याचे शेडमध्ये व खंडू भोसले याचे हॉटेलमध्ये जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, ३४ हजार ३२० रुपयांची रोकड, १५ मोबाईल व २ मोटार सायकली असा एकूण ३ लाख ६० हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण १७ इसमांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द भादा पोलीस ठाणे येथे गुरनं १८०/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास भादा पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. शिरीष पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे, पथकाने औसा शहरातील कालन गल्लीतील, अबुझर अतिक शेख याचे इमारतीत मटका बुकीवर कारवाई करत, २२ हजार ८८० रुपयांची रोकड व ६९ हजार ४०० हजार रुपयांचे १० मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण १४ आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द औसा पोलीस ठाणे येथे गुरनं ४९८/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास औसा पोलीस ठाण्यातील पोहेकॉ बालाजी चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.



उपरोक्त दोन्ही कारवायांत, पथकाने एकूण ३१ आरोपींकडून ५७ हजार २०० रुपयांची रोकड, २५ मोबाईल व २ मोटार सायकली असा एकूण ४ लाख ५२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे व गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

# पीएसआय अमोल गंगलवाड यांची वर्दीवरच आत्महत्या

**हिंगोली(प्रतिनिधी)**– येथील खटकाळी बायपास भागात रेल्वेसमोर उडी घेऊन एका पोलीस उपनिरीक्षकाने आत्महत्या केल्याची घटना आज शनिवारी रोजी घडली आहे. या दुर्दैवी घटनेनं शहरात एकच खळबळ उडाली आहे. अमोल विठ्ठलराव गंगलवाड (वय ४०) असं आत्महत्या केलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचं नाव आहे.

हिंगोलीतील खटकाळी रेल्वे उड्डाणपुलाजवळ आज शनिवारी सकाळी साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास पूर्णाकडून अकोल्याकडे जाणाऱ्या पॅसेंजर रेल्वेसमोर उडी घेऊन अमोल गंगलवाड यांनी आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी अंगावरील खाकी गणवेशावरच हे टोकाचं पाऊल उचललं.

आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट

रेल्वे कर्मचाऱ्यांना ही माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलीस प्रशासनाला कळवलं. त्यानंतर शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, सहायक पोलीस निरीक्षक दीपक मस्के, पोलीस उपनिरीक्षक संजय मार्के, शेख अजमत आदी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृत अमोल गंगलवाडहे हिंगोली येथील पोलीस नियंत्रण कक्षात सेवेत असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, त्यांनी नेमकी कोणत्या कारणातून आत्महत्या केली, याची कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# महाराष्ट्रानंतर आता देशभर 'या' पनीरवर बंदी येणार?

**मुंबई(प्रतिनिधी)**–जर तुम्ही हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पनीरच्या डिश आवडीने खात असाल तर तुमच्यासाठी ही अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. देशभरात सध्या 'ॲनालॉग पनीर'चा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असून त्यामुळे अन्न सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये या बनावट पनीरविरोधात आधीच कडक कारवाई करण्यात आली असून, आता संपूर्ण देशभरात याच्या विक्रीवर आणि वापरावर पूर्ण बंदी घालण्याच्या विचारात केंद्र सरकार आहे.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजीत पुन्हानी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ॲनालॉग पनीरचा मुद्दा आता केवळ एका-दुसऱ्या राज्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. त्यामुळे येत्या काळात याच्या वापरावर देशभरात पूर्णपणे बंदी घालण्यासाठी मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो.




हा मुद्दा केवळ पनीरच्या दर्जापुरता मर्यादित नसून ग्राहकांची होणारी मोठी फसवणूक आहे. अनेक हॉटेल्स, ढाबे आणि खाद्य व्यावसायिक ग्राहकांना खऱ्या दुधाचे पनीर सांगून स्वस्त दरातील ॲनालॉग पनीर खायला घालतात.

ग्राहकांचे आरोग्य आणि त्यांची होणारी दिशाभूल रोखण्यासाठी आता कडक धोरण अवलंबत आहे. जर केंद्र सरकारने यावर देशभरात पूर्ण बंदी लादली, तर सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि फुड व्यावसायिकांना नवीन नियमांचे कडक पालन करावे लागेल.

# विषाणूजन्य आजारांच्या उद्रेकाने साथीच्या आजारांना आमंत्रण

**छत्रपतीं भाजीनगर (प्रतिनिधी)**– मागच्या किमान तीन आठवड्यांपासून पाऊस थांबला आहे आणि थंड-गरम वातावरणामुळे डास-चिलटांबरोबरच विविध विषाणुजन्य आजारांचा उपद्रवही कमालीचा वाढला आहे. परिणामी, समस्त रुग्णालयांमध्ये डेंगी, स्वाइन फ्लू सदृश रुग्ण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. पैकी काहींना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ येत असल्याचे वैद्यकीय वर्तुळातून सांगण्यात आले.

सद्यस्थितीत डास-चिलट खूप जास्त प्रमाणात वाढले आहेत व त्यामुळे घरात दहा मिनिटेही स्वस्थ बसणे शक्य होत नसून, मॉस्क्युटो रिपेलंट काम करत आहे का नाही, अशी शंका येण्यासारखी स्थिती आहे. त्याचाच परिणाम म्हणून डास मारायची बॅट घेऊन बसण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे, समस्त रुग्णालयांमध्ये डेंगी, स्वाइन फ्लू सदृश रुग्ण वाढले आहेत.

## जाहीर प्रगटन

**बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १८९/२०२६**

पुढील तारीख २९.०९.२०२६

अर्जदार-०१. भगवान पि. मारोतीराव जाधव वय ६६ वर्ष, व्यवसाय शेती, रा. हिप्परगा ता. बिलोली जि. नांदेड ०२. भाग्यश्री भगवान जाधव, वय ३७ व्यवसाय -घरकाम, रा. हिप्परगा ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

**विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत कृष्णा भगवान जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र ०१ ही मयत कृष्णा भगवान जाधव यांची आई आहे व अर्जदार क्र २ हे वडील आहेत. मयत कृष्णा भगवान जाधव हे हिप्परगा ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवासी होते त्यांच्या मृत्यू दिनांक २८/०४/२०२६ रोजी हिप्परगा येथे झाला.

अर्जदार क्रमांक ०१ ते ०२ हयांना मयत कृष्णा भगवान जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये असंतोष; लष्करी नियंत्रणाविरोधात 'संयुक्त आवामी कृती समिती'चे आंदोलनाचे आवाहन



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पाकव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तानी लष्कराच्या दडपशाहीविरोधात तेथील नागरिकांचा संताप अखेर उफाळून आला आहे. पाकिस्तानी लष्कर आणि प्रशासनाच्या जुलमी राजवटीला विरोध दर्शवत, जम्मू आणि काश्मीर संयुक्त आवामी कृती समितीने या भागात पुन्हा एकदा व्यापक आंदोलनांची घोषणा केली आहे. शैक्षणिक संस्था आणि वैद्यकीय केंद्रांवर ताबा मिळवून लष्कराने नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, पाकिस्तानी सुरक्षा दलांच्या अवाजवी उपस्थितीमुळे आणि नाकेबंदीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. संवेदनशील जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये आणि प्रमुख रुग्णालयांवर लष्कराने ताबा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच, आजारी आणि जखमी नागरिकांना रुग्णालयांपर्यंत पोहोचण्यास मज्जाव केला जात असल्याने गंभीर आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत.

# पंतप्रधान मोदी उझबेकिस्तान आणि किर्गिझस्तानच्या दौऱ्यावर रवाना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– पंतप्रधान नरेंद्र मोदी उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताकच्या चार दिवसीय दौऱ्यावर रवाना झाले आहेत. दौऱ्यापूर्वीच्या निवेदनात मोदींनी विश्वास व्यक्त केला की, त्यांच्या उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताकच्या दौऱ्यामुळे मध्य आशियातील भारताची सामरिक भागीदारी अधिक मजबूत होईल आणि या प्रदेशासोबतचे सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील.

पंतप्रधानांनी नमूद केले की, अलिकडच्या वर्षांत भारत-उझबेकिस्तान सामरिक भागीदारीने लक्षणीय प्रगती केली आहे. ते म्हणाले की, ते उझबेक राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्झीयोयेव यांच्यासोबत व्यापार आणि गुंतवणूक, डिजिटल कनेक्टिव्हिटी, संरक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक दृढ करण्यावर, तसेच विकसित भारत आणि तरुण उझबेकिस्तानच्या सामायिक दृष्टिकोनाला पुढे नेण्यावर चर्चा करतील. मोदी म्हणाले की, ते शास्त्री स्मारक आणि ताश्कंद स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ओरिएंटल स्टडीज पंतप्रधानांनी सांगितले की, ते किर्गिझ प्रजासत्ताकचे अध्यक्ष सादिर झापारोव्ह यांच्या निमंत्रणावरून बिश्केक येथे होणाऱ्या २६ व्या शांघाय सहकार्य संघटना शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.

# जीएसटीचे लाचखोर अधिकारी सीबीआयच्या जाळ्यात

**मुंबई (प्रतिनिधी)**– केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुरुवारी जीएसटी विभागाच्या अतिरिक्त आयुक्त, अधिक्षकासह तिघांना अटक केली. दगड खाणीच्या रॉयल्टीबाबत आणि जीएसटी रक्कम माफ करण्याच्या मोबदल्यात आरोपी अधिकाऱ्यांनी व्यावसायिकाकडे तब्बल दीड कोटींची लाच मागितली होती. तडजोडीअंती ४० लाख रुपये एजंटमार्फत स्वीकारताच त्यांना अटक केल्याचे सीबीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले.

सीबीआयच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यावसायिकाची रायगड जिल्ह्यात दगड खाण आहे. खाणीसाठी मिळणारी रॉयल्टी आणि व्यावसायिकाला लावण्यात आलेला जीएसटी माफ करण्यासाठी त्यांनी अधीक्षक राकेशकुमार सिन्हा यांची भेट घेतली.

सीबीआयने तक्रारीत तथ्य असल्याने या प्रकरणी गुरुवारी सापळा रचला. कंथेटी आणि सिन्हा यांच्या वतीने ४० लाख रुपये घेताना एजंट नरिंदर राजपूत याला पकडण्यात आले.

# 'समृद्धी'वर हॉलिवूड सिनेमास्टाईल पडले ४ दरोडे

**मुंबई(प्रतिनिधी)**–समृद्धी महामार्गावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत ज्या ठिकाणी अंधार आहे आणि कुणी थांबणार नाही अशाच ठिकाणी पाठलाग करून वाहनांना एकतर तिथे आणले जातं किंवा रस्यावर खिळे, लोखंडी रॉड टाकून थांबवलं जातंय. खिळ्यांमुळे कारचं टायर पंक्चर होतं आणि मग पाठलाग करून कारला थांबवलं जातं.

महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणून ओळखला जाणारा समृद्धी महामार्ग आता अपघातानंतर दरोडेखोरांचा अड्डा बनला आहे. एकीकडे सुसाट वेग आणि दूरपर्यंत मनुष्यविरहित असलेला रस्ता यामुळे दरोडेखोरांनी महामार्गावर लुटालूट वाढवली आहे. एकाच रात्री ४ दरोडे टाकण्यात आले आहेत. यामुळे प्रवाशांना मारहाण आणि सोने आणि पैशांची लूट केली आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गावर ही लूट नेमकी झाली कशी, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

मुंबई ते नागपूर या दोन्ही शहरांना कनेक्ट करण्यासाठी समृद्धी महामार्ग मोठा गाजावाजा करून सुरू करण्यात आला. कमी वेळ, जलद प्रवासामुळे लोक वेळेवर तर पोहोचत आहेत यात शंका नाही. पण, आता समृद्धी महामार्गावर चोरांचा सुळसुळाट झाला आहे. एका हॉलिवूड सिनेमाला लाजवेल अशा पद्धतीने हे दरोडे टाकले जात आहेत.

शुक्रवारी एकाच रात्री ४ अशा घटना घडल्या आणि चारही घटनांमध्ये पद्धत ही जवळपास एकसारखीच होती. यामध्ये दरोडेखोरांनी कारचा पाठलाग करण्यासाठी काही स्वस्त आणि जुन्या गाड्या वापरल्या नाही. क्रेटा, महिंद्रा एसयूव्ही ००७ आणि किया सेल्टास अशा पॉवरफुल एसयूव्हीचा वापर केला हे कारच्या डॅशकॅममध्ये दिसून आलं.


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई; वाळू तस्करी आणि घातक शस्त्र बाळगणाऱ्यांवर गुन्हे दाखल, १६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** अवैध गौण खनिज उत्खनन, वाळू तस्करी आणि अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी तीन स्वतंत्र कारवाया करून एकूण १६ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ५ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी गोदावरी नदीपात्र, गंगाबेट परिसरात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाल्याने ग्रामीण पोलिसांच्या पथकाने छापा टाकला.

यावेळी सोमनाथ सोनटक्के आणि सखाराम तोंडचिरे (दोघे रा. तोंडचिर) हे इंजिनच्या सहाय्याने वाळू उपसा करताना आढळले. पोलिसांनी २ इंजिन (६ लाख





रुपये), ८ तराफे (४ लाख रुपये) आणि २६ ब्रास वाळू (१.३० लाख रुपये) असा एकूण ११ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी बीएनएस कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ४८(७), ४८(८) व पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

२८ ऑगस्ट रोजी रात्री नाईट पेट्रोलिंग दरम्यान विष्णुपुरी येथील गुरु गोविंदसिंग इंजिनिअरिंग कॉलेजसमोर (MH-43-BG-4059) क्रमांकाचा वाळूने भरलेला ४०७ टिपर आढळला. चालक शेख इम्रान शेख रब्बानी (वय २१, रा. हातई) याच्याकडे परवाना नसल्याने ५ लाखांचा टिपर व १० हजारांची २ ब्रास वाळू असा ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहन मालक अशपाक पैलवान याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध शस्त्रविरोधी मोहिमेत वसरणी परिसरात घातक शस्त्र बाळगून फिरणारा संजूसिंग राजेंद्रसिंग बावरी (वय ३५, रा. वसरणी) याला सापळा रचून अटक करण्यात आली. त्याच्याकडून २७ इंच व ३१ इंच लांबीचे दोन धारदार खंजर (किंमत २ हजार रुपये) जप्त करण्यात आले असून, शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि रविंद्र तारू, व्यंकट कुसमे, बाबुराव चव्हाण व अंमलदारांनी केली असून अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## स्वारातीम विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खुली मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)–** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने मुला-मुलींसाठी खुल्या ६ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील खेळाडूंनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरूंनी हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात केली.

६ कि.मी. मॅरेथॉनमध्ये मुलांच्या गटात गंगाखेड येथील प्रतीक पवार यांनी प्रथम क्रमांक पटकावत ५,००१ रुपये पारितोषिक मिळविले. किनवट येथील प्रणव राठोड यांनी द्वितीय क्रमांक (३,००१ रुपये), माहूर येथील वैभव तरंगे यांनी तृतीय क्रमांक (२,००१ रुपये), तर करण खंडारे यांनी चतुर्थ क्रमांक (१,००१ रुपये) मिळविला.

मुलींच्या गटात लातूर येथील पुष्पा राठोड यांनी प्रथम क्रमांक मिळवत ५,००१ रुपये पारितोषिक पटकावले. परभणी येथील प्रमिला बाबर यांनी द्वितीय क्रमांक (३,००१ रुपये), उदगीर येथील वैष्णवी राठोड यांनी तृतीय क्रमांक (२,००१ रुपये), तर नांदेड येथील रूपाली घोडके यांनी चतुर्थ क्रमांक (१,००१ रुपये) मिळविला.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आणि डॉ. भीमा केंगले यांच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



**नांदेड–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मासिक सभा बँकेचे अध्यक्ष तथा आ. तुषार राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपाध्यक्षा डॉ. मीनल पाटील खतगावकर, संचालक तथा आ. भीमराव केराम, माधवराव पाटील जवळगावकर, बी. आर. कदम, राजेंद्र केशवे, शिवराम लुटे, कैलाश देशमुख गोरठेकर, मारोतराव कवळे, श्रीनिवास चव्हाण, रामचंद्र मुसळे, अनिल पाटील बाभळीकर, मारोती जाधव, पुनम पवार, संचालिका सुशीलाताई बेटमोगरेकर, संगीता पाटील डक या संचालकंसह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## कॉलेजला गेलेली १९ वर्षीय तरुणी बेपत्ता; भाग्यनगर पोलिसांत तक्रार

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील भाग्यनगर पोलीस ठाणे हद्दीत कॉलेजला गेल्यानंतर १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून तरुणीचा शोध घेण्यात येत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अप्पाराव माधवराव नरवाडे (वय ४३, रा. खुरगाव, ता. जि. नांदेड) हे शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून, त्यांची १९ वर्षीय मुलगी नांदेड येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.

दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी ती मुलगी नेहमीप्रमाणे कॉलेजला गेली होती. मात्र, कॉलेजमधून बाहेर पडल्यानंतर ती घरी परतली नाही. कुटुंबियांनी नातेवाईक, मित्रमैत्रिणी तसेच परिचितांच्या ठिकाणी शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर तिच्या वडिलांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीनुसार दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी अदखलपात्र/बेपत्ता नोंद क्रमांक ६२/२०२६ नोंदविण्यात आली असून, वरिष्ठांच्या आदेशाने हवालदार कांदावार यांच्याकडे शोधकार्य सोपविण्यात आले आहे.

बेपत्ता तरुणीचे वय १९ वर्षे असून उंची अंदाजे ५ फूट ६ इंच, रंग सावळा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ती पंजाबी पोशाख परिधान करून कॉलेजला गेली होती. तिच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भाग्यनगर पोलीस ठाणे, नांदेड येथे या प्रकरणाची नोंद असून पोलिसांकडून पुढील तपास व शोधकार्य सुरू आहे.

## अभंग रंगनाथाचे पुस्तिकेचे आज प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील कवी मंगेश मधुकरराव कवटीकवार लिखित अभंग रंगनाथाचे या पुस्तिकेचे प्रकाशन आज रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता वासवी भवन, सिडको रोड येथे भागवताचार्य महेश महाराज शेवाळकर यांच्या व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सदरील अभंगमाला पुस्तिकेत वेदान्त केसरी ह.भ.प. रंगनाथ महाराज परभणीकर गुरूजी यांच्या जीवनचरित्रावर आधारित अभंगांचा समावेश आहे.

यावेळी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप कंदकुर्ते, न्यायाधीश जितेंद्रीय जोशी सावळेश्वरकर, धर्मप्रकाश एकनाथ मामडे, सुभाष कन्नावार, चिन्मय मिशन अध्यक्ष भीमराव रामीनवार, अभियंता प्रकाश पत्तेवार, ज्ञानेश्वर कवटीकवार, पत्रकार विजय बंडेवार यांची उपस्थिती लाभणार आहे.

या प्रकाशन सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंगेश कवटीकवार व संयोजन समितीने केले आहे.

## नांदेड येथे आज धनगर समाजाची राज्यस्तरीय बैठक

### संघर्ष योद्धा दीपक बोराडे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहावे –वाघमारे

**नांदेड (प्रतिनिधी)–** धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या लढ्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी नांदेड येथे ३० ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करून आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे. तरी धनगर समाजातील नेत्यांनी, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन ओबीसी नेते तथा नांदेड पंचायत समितीचे माजी सभापती बबन वाघमारे यांनी केले आहे.

नांदेड शहरातील विजयनगर येथील हनुमान मंदिरात ३० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या मागणीसाठी समाजाच्या विविध संघटना आणि कार्यकर्त्यांकडून सातत्याने आंदोलन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय बैठकीत आरक्षणाच्या लढ्याची आगामी रणनीती, आंदोलनाची दिशा आणि समाजाची एकजूट याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय होणार आहे. आरक्षण योद्धा दीपक बोराडे यांनी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच शहरी भागात धनगर समाजाच्या बैठका घेतल्या आहेत. त्यांनी संपर्क साधून वातावरण निर्मिती केली आहे. या बैठकीला समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## एकतानगर खून प्रकरण: तिघांना ३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी, ५ आरोपी ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील एकतानगर भागात २७ ऑगस्टच्या रात्री युवक आकाश दवणे याचा खून झाल्याच्या प्रकरणाचा भाग्यनगर पोलिसांनी तपास वेगाने सुरू केला आहे. मयताची आई सविता दवणे यांनी दिलेल्या तक्रारीत दोन महिला आणि दोन अल्पवयीन मुलांसह एकूण नऊ आरोपींची नावे नमूद करण्यात आली आहेत.

पोलिसांनी आतापर्यंत दोन अल्पवयीन मुलांसह पाच जणांना ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन बालकांना नियमानुसार बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे, तर प्रौढ आरोपी नितीन लक्ष्मण सावते, कुणाल लक्ष्मण सावते आणि साहिल उर्फ चिक्या रमेश दुधमल या तिघांना न्यायालयात हजर करण्यात आले.

या खून प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत इंगोले यांच्याकडे सोपविण्यात आला असून, भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पथक पुढील तपास करीत आहे.

पोलिसांनी तिघा आरोपींना शनिवारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. हत्येचा नेमका घटनाक्रम, प्रत्येक आरोपीची भूमिका, गुन्ह्यामागील कारण आणि आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास करण्यासाठी कोठडी आवश्यक असल्याचा युक्तिवाद पोलिसांनी केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कायस्थ यांनी तिघांनाही ३ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




**नांदेड** –युवा विद्यार्थी असोसिएशन महाराष्ट्राच्यावतीने राज्यव्यापी बेमुदत आमरण उपोषणास युवक काँग्रेसच्यावतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष तिरूपती कोंढेकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, एनएसयूआय शहराध्यक्ष अक्षय नळगे, अंबादास रातोळे, गणेश पाटील कोकाटे, सोनू पाटील, प्रकाश दीपके, आशिष पाटील, दीपकसिंघ हुजूरीया, अजहर शेख, मिलिंद लोहकरे, माही एडके, अक्षय अरसुळे आदी पदाधिकारी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## ऊस पिकावरील रोगराई रोखण्यासाठी बांधावरच तज्ज्ञांचे मार्गदर्शन

### कुंटूरकर शुगरचा शेतकरी हिताचा उपक्रम; ३१ ऑगस्टपासून विविध गावांत ऊस पिकाची पाहणी

**नायगाव (प्रतिनिधी)**–ऊस गाळप हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर शेतात उभ्या असलेल्या ऊस पिकावर पायरीला रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. ही बाब लक्षात घेऊन रोगाचा प्रादुर्भाव वेळीच रोखण्यासाठी कुंटूरकर शुगर अँड ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड, मोहननगर-कुंटूर यांच्या वतीने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तज्ज्ञ मार्गदर्शन करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ३१ ऑगस्टपासून कारखाना कार्यक्षेत्रातील विविध गावांमध्ये ऊस पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे.



पायरीला रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास ऊस पिकाच्या वाढीवर तसेच उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रोगाची लक्षणे सुरुवातीच्या टप्प्यातच ओळखून योग्य उपाययोजना करण्याच्या उद्देशाने कारखान्याच्या शेती विभागाने हा उपक्रम सुरू केला आहे. ऊस पिकाची सद्यस्थिती, रोगाचा प्रादुर्भाव, पिकाची योग्य निगा, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक बाबींबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मार्गदर्शन मिळणार आहे.

ज्येष्ठ ऊसतज्ज्ञ जगन्नाथ ढिकले आणि कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सतीश देशमुख हे स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर उपस्थित राहून ऊस पिकाची पाहणी करणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना रोगाची लक्षणे, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आणि पिकाचे नुकसान टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची माहिती तज्ज्ञांकडून थेट मिळणार आहे.

दरम्यान, रोगग्रस्त किंवा फवारणीची आवश्यकता असलेल्या ऊस क्षेत्रासाठी ड्रोनद्वारे फवारणीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे ड्रोन फवारणीची आवश्यकता असलेल्या शेतकऱ्यांनी कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रतिभा निकेतन महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमीत्त गुणवंत खेळाडूंचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक प्रतिभा निकेतन महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी राष्ट्रीय पातळीवर प्रतिभा निकेतन महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पृथ्वीराजसिंग राठोड तायक्कांदो, कन्हैया खानसोळे रस्सीखेच, तेजस्वीनी राठोड तायक्कांदो आणि प्रक्षीत पटानगीरी बॅडमिंटन या खेळाडुंनी संबंध/त क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर व उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ व महाविद्यालयाचा विशेषांक देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी बोलताना

प्राचार्य डॉ. गंगाखेडकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, कारण खेळातून व्यक्तिमत्त्व विकास व शिस्त लागते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी क्रीडा संचालक डॉ. दीपक वाघमारे यांनी केले. त्यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनप्रवासावर व क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानावर प्रकाश टाकला, तसेच महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा मांडला.

## भगवान बाबा जयंतीनिमित्त कार्यक्रम



**किनवट (प्रतिनिधी)–** दि. १ सप्टेंबर हा समाज सुधारक राष्ट्रसंत भगवानबाबांच्या जन्मोत्सवाचा सुवर्ण दिवस. त्या औचित्यावर तालुक्यातील प्रधानसांगवी (दूधगाव) येथील संत भगवानबाबा विद्यालयात १३० वा जन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. समाजबांधवांसह तमाम भक्तांनी उपस्थित राहून सोहळा द्विगुणीत करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रसंत भगवानबाबांच्या विचारांचा दीप प्रज्वलित करून त्यांच्या जीवनमूल्यांचा ठेवा आपल्या जीवनात साकारण्यासाठी म्हणून दि. १ सप्टेंबर हा सुवर्ण दिवस प्रेरणास्रोत मानला जातो. या दीपस्तंभाचा आदर्श आजच्या तरुणाईसमोर तेवत ठेवण्यासाठी मान्यवरांचे प्रबोधन सुद्धा तेवढेच महत्त्वाचे ठरणार असल्याने समाजबांधवांनी जन्मोत्सवाला उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

१ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता श्रीसंत भगवानबाबांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. त्यानंतर श्रीसंत भगवानबाबांच्या जीवन चरित्रावर मान्यवरांचे प्रबोधन होणार असून, शेवटी वृक्षारोपणाच्या उपक्रमाने जन्मोत्सव सोहळ्याची सांगता होणार असल्याचे संयोजकांनी कळविले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com